विद्या प्रसारक मंडळ, ठाणे

| | | |
|---|---|---|
| मासिकाचे नाव | : | सद्धर्म : त्रैमासिक |
| संस्थापक | : | गुंडोपंत, हरिभक्त |
| संपादक | : | डॉ. विजय वा. बेडेकर |
| प्रकाशक | : | अनंत विनायक धोरे |
| प्रकाशन वर्ष | : | २०१६ |
| वर्ष | : | एक्कावनवे |
| अंक | : | पहिला |
| पृष्ठे | : | ३२ पृष्ठे |

**गणपत्रिका विद्या प्रसारक मंडळाच्या**

**"ग्रंथालय" प्रकल्पांतर्गत निर्मिती**

**गणपत्रिका निर्मिती वर्ष : २०१६**

**गणपत्रिका क्रमांक : १८७**

Registered with the Registrar of News-paper for India, under R.N. 20770/71

सद्धर्म प्रकाशन

संस्थापक
गुंडोपंत हरिभक्त

वार्षिक ऐच्छिक देणगी
किमान ७५ रुपये

दीर्घकालीन (१५ वर्ष) सभासद देणगी १००० रु.
भारताबाहेरील सभासद देणगी १२५ $

# सद्धर्म
त्रै मा सि क

।। त्रैलोक्यं मंगलं कुरु ।। नामूलं लिख्यते किंचित् ।।

वर्ष : एक्कावनवे अंक : पहिला फाल्गुन शके १९३७/चैत्र शके १९३८, एप्रिल २०१६

## *संपादकीय*

## बोले तैसा चाले त्याचीं...

११ ते १३ मार्च २०१६ च्या कालावधीत अध्यात्मिक गुरु श्री. श्रीरविशंकर यांच्या संघटनेतर्फे अत्यंत भव्य, दिव्य आणि नेत्रदीपक असा सोहळा दिल्ली जवळील यमुनेच्या पात्रामध्ये ऊरकण्यात आला. अशा भव्य आणि दिव्य कार्यक्रमांचे नियोजन हे मोठे आव्हानच असते. यांच्या आर्थिक आणि व्यावहारीक नियोजनाकरता कित्येक महिने आणि वर्षांची गरज असते. यामुळे अशा कार्यक्रमांच्या संदर्भात आयत्यावेळी वाद निर्माण करणे किंवा तांत्रिक त्रुटी काढून कार्यक्रम रद्द करण्याची मागणी करणे, हे त्रासदायकच नाही तर अशी मागणी करणाऱ्यांच्या हेतूंबद्दलही शंका निर्माण करते. कुठल्याही सभ्य समाजामध्ये (civilized society) अशा कार्यक्रमांच्या नियोजनाकरता अनेक परवान्यांची गरज असते. व्यापक जनहीत लक्षात घेऊनच त्यांची रचना केलेली असते. म्हणूनच परवाना मागणाऱ्या आणि परवाना देणाऱ्या घटकांनी वेळेच्या बंधनाचा मान राखत, आणि कुठलीही संदिग्धता न ठेवता आपले विहित कर्तव्य पार पाडणे अपेक्षित असते. दुर्दैवानी या कार्यक्रमाच्या बाबतीत मात्र या संकेतांचे कसोशीने पालन झाले असे दिसत नाही.

अशा भव्यदिव्य कार्यक्रमामुळे एखाद्या संघटनेच्या आर्थिक आणि अनुयायी क्षमतेचे प्रभावी प्रदर्शन होत असले तरी 'अध्यात्म' किंवा 'विश्वशांती' करता यामुळे तसूभरही फायदा होतो असे दिसत नाही. अध्यात्मामध्ये तर 'मी' आणि 'माझा परिसर' यांचे एक अतुट नाते असते. मानवाच्या अनिर्बंध जीवनशैलीमुळे पर्यावणाचे संतुलन आणि जैव वैविधता धोक्यांत आली आहे या करता आता वेगळ्या पुराव्याची गरज नाही. यामध्ये संतुलन राखण्याकरता म्हणून मानवी व्यवहारावर अनेक निर्बंधहि सुचवण्यांत आले आहेत. अध्यात्म, शांति किंवा इतर कुठल्या कारणाकरता या संकेतांचा भंग होणे स्वागतार्ह नाही.

(पृष्ठ क्र. ३० वर)

## सद्धर्म त्रैमासिकासंबंधी माहिती व सूचना

१) 'सद्धर्म' त्रैमासिकाचे वर्ष एप्रिल ते मार्च आहे. सौ. मालतीबाई नवाथे ट्रस्टच्या सद्धर्म प्रकाशनातर्फे हे त्रैमासिक एप्रिल, जुलै, ऑक्टोबर व जानेवारी या महिन्यात प्रसिद्ध केले जाते. या अंकाचे वर्षात केव्हाही सभासद होता येते. सभासद झाल्यावर त्या वर्षाचे ४ अंक पाठविले जातील.

२) ट्रस्टच्या कार्यालयाचा पत्ता : **सौ. मालतीबाई नवाथे ट्रस्ट,** द्वारा लक्ष्मी-केशव कार्यालय, प्रताप सिनेमासमोर, कोलबाड, ठाणे-४००६०१.दूरध्वनी : २५४७२७७१ कार्यालयाची वेळ : सकाळी १० ते सायं. ७.

३) **सभासद देणगी** : वार्षिक ७५ रु., दीर्घकालीन १००० रु.(१५ वर्षाकरता)

परदेशस्थ सभासदांना १२५ $ दीर्घकालीन योजना (१५ वर्षाकरता) .५०० रुपये आजीव सभासद योजना २००९ पासून बंद करण्यात आली असून नवीन दीर्घकालीन सभासद योजना सुरु करण्यात आली आहे. ३१ मार्च २००९ पर्यंत झालेल्या सर्व आजीव सभासदांना हा अंक त्यांच्या हयातीपर्यंत पाठविला जाईल. बऱ्याच आजीव सभासदानी वाढत चाललेल्या महागाईचा विचार करुन आम्ही केलेल्या विनंतीनुसार ऐच्छिक देणगी म्हणून ५०० रुपये ते १००० रुपये पाठविले आहेत. ज्यांनी आजपर्यंत ऐच्छिक देणगी पाठविली नाही त्यांनी ती लवकर पाठवावी अशी कळकळीची विनंती आहे.

४) देणगी, धनादेश (चेक) किंवा धनरोखाने (डिमाण्ड ड्राफ्ट) ट्रस्टच्या कार्यालयाच्या पत्त्यावर पाठवावी. देणगी पाठविताना आपले संपूर्ण नाव (संस्था अस त्यास अध्यक्ष किंवा कार्यवाह) पूर्ण पत्ता (पिन कोडसह) सभासद क्रमांक (सभासद असल्यास) व दूरध्वनी क्रमांक (कोड नंबरसह) ही माहिती सुवाच्य अक्षरांत कळवावी.

५) **दि. १ एप्रिल २०१५ पासून मनीऑर्डरने पैसे पाठविता येणार नाहीत.**

**देणगी ट्रस्टच्या खालील बँकांतील सेव्हिंग्ज खात्यांतही भरता येईल.**

| बँक | शाखा | खाते क्र. | बँक IFSC कोड |
|---|---|---|---|
| स्टेट बँक ऑफ इंडिया SBI | जे के ग्राम, ठाणे (प.) | 10884930955 | SBIN 0009056 |
| ठाणे जनता सहकारी बँक TJSB | खोपट, ठाणे (प.) | 009110100016689 | TJSB 0000009 |
| ठाणे भारत सहकारी बँक लि. TBSB | मुख्य शाखा,ठाणे (प.) | 002115000024520 | TBSB 0000002 |

भारतीय स्टेट बँक त्यांच्या इतर शाखांतून आलेली रोख रक्कम (चेक नव्हे) ग्राहकांच्या खात्यांत जमा करण्याकरता २५ रुपये सेवा शुल्क आकारते. तेव्हा त्या बँकेत देणगी रोख रकमेत पाठविताना २५ रुपये अधिक पाठवावे.

वरील बँकांमार्फत देणगी पाठविल्यास पोस्टकार्डाने किंवा दूरध्वनी वरुन ट्रस्टच्या कार्यालयात किंवा श्री. प्रकाश भास्कर दीक्षित (कार्यकारी विश्वस्त) यांना कळवावे. यामुळे देणगीची नोंद घेणे सोयीचे होईल. (पत्ता पुढे दिला आहे.)

देणगी खालील ठिकाणी ही स्वीकारली जाते.

अ) **श्रीधर भालचंद्र आणि कंपनी**, कापडाचे व्यापारी, १४८, प्रार्थना समाज, गिरगांव, मुंबई - ४०० ००४. दूरध्वनी : २३८८०६४५ (रविवारी बंद) येथे **फक्त रोख रक्कम स्वीकारली जाईल. याठिकाणी धनादेश पाठवू नये.**

५) सद्धर्म त्रैमासिकासंबंधी अधिक माहिती हवी असल्यास खालील ठिकाणी संपर्क साधावा.

**श्री. प्रकाश भा. दीक्षित**, ३०२, दुर्गा सोसायटी, कोलबाड, ठाणे४००६०१. दूक्र : २५४७२००५, भ्र.क्र.: ९८१९६९३१९५ अंकाच्या पाकिटाच्या पत्त्याच्या लेबलवर खालील माहिती छापली आहे.

सभासद क्रमांक वा. दे.(वार्षिक देणगीदार सभासद), दी. का.(दीर्घकालीन सभासद),आ. (आजीव सभासद), का.भे. (कायम भेट)'वा. दे.' व 'दी. का.' याच्या पुढे देणगी संपण्याचा महिना व वर्ष नोंदविलेला असतो.

**- संपादक**

## *अनुक्रमणिका*


| | |
|---|---|
| संपादकीय | १ |
| देणगीसंबंधी निवेदन | २ |
| संस्कृत सुभाषितांचे अंश व समानार्थी म्हणी, वाक्प्रचार | ४ |
| श्रीमच्छंकराचार्यविरचितं द्वादशज्योतिर्लिङ्गस्तोत्रम्। उज्जयिन्यां महाकालम्। | ५ |
| गीतकृष्णायन-भाग ४- युगपुरुष | ६ |
| वामनाची गोष्ट | ९ |
| उतार वयातील एकटेपण सुसह्य कसे होईल ? | १५ |
| श्रीगणेश उपासेनेचे सर्वश्रेष्ठत्व | १७ |
| कौटिल्यीय अर्थशास्त्र-'राष्ट्र संकल्पना' | २१ |
| मरणोत्तर जीवन आणि पुनर्जन्म सिद्धांत | २२ |


या अंकात इतरत्र ठाणे येथील व्यास क्रिएशन यांनी घेतलेल्या एका निबंध स्पर्धेसाठी श्री. दीक्षित यांनी लिहिलेला निबंध आपल्या देणगीदारांच्या वाचनासाठी छापला आहे. तो वाचल्यावर आपणास कांही नवीन विषय, विचार सुचल्यास ते सध्दर्म वाचकांसमोर मांडले जावेत असे वाटत असेल तर अधिक तपशीलासह कृपया सध्दर्मशी संपर्क साधावा अशी विनंती आहे. आपणांस कांही लेख पाठवायाचे असल्यास तेही पाठवावेत. संपादकांच्या अनुमतीने योग्य असल्यास, आवश्यकता वाटल्यास योग्य ते संपादकीय संस्कार करून छापले जातील. सर्व देणगीदारांस नम्र विनंती - बँकेत परस्पर जमा रकमेचा ते पैसे कोणी भरले आहेत याचा तपशील दिला जात नसल्याने देणगीदाराच्या नांवावर पैसे जमा करता येत नाहीत, पण न्यासाच्या हिशोबात योग्य प्रकारे नोंद घेतली जाते. गेल्या आर्थिक वर्षात ५ ते ७ अशा नोंदी आहेत, त्या कमी करण्याचा आमचा प्रयत्न असतो. आपण सहकार्य करावे. सध्दर्मच्या दैनंदिन कामासाठी ५० ते ६० वयोगटातील स्वयंसेवी व्यक्तिच्या शोधात आहोत. इच्छूकानी संपर्क साधावा.

**- संपादक**

### सद्धर्माची प्रकाशने

(पोस्टेज सह)

| | | |
|---|---|---|
| १) | सुलभ संध्या व पूजा | रु. ५ |
| २) | श्री गणेश चतुर्थी पूजाविधि | रु. ५ |
| ३) | हरितालिका पूजा विधि | रु. १० |
| ४) | श्री सत्यनारायण पूजा व कथा | रु. १५ |
| ५) | कोजागिरी पूजाविधि (मराठी कथेसह) | रु. १० |
| ६) | तुलसी विवाहविधि | रु. १० |
| ७) | पातंजल योग सूत्राणि (मराठी अर्थासह) | रु.२५ |
| ८) | कै. ह.ज. दामले स्मृती विशेषांक (या अंकात मौलिक विचारांचे लेख व उद्बोधक, उपयुक्त माहिती आहे. अवश्य संग्रही असावा, असा हा अंक आहे.) | रु.१५ |
| ९) | सौंदर्यलहरी स्तोत्र (मराठी समश्लोकीसह) | रु.३० |
| १०) | उपासना | रु. ४० |
| ११) | श्रीरामरक्षेतील व्याकरण | रु. ५० |
| १२) | चांगदेव पासष्टी | रु. ४० |
| १३) | गंगालहरी | रु. २५ |
| १४) | गणपत्यथर्व शीर्षातील व्याकरण | रु. ३० |
| १५) | सांख्यदर्शन | रु. ३० |
| १६) | श्री लक्ष्मी पूजा विधीः (हस्तलिखीत) | रु. १५ |

### जानेवारी ते मार्च २०१६

**दीर्घकालीन सभासद (दी. का.)**

भांडारकर किर्तिलता शांताकुमार, मुंबई

सखाराम जी पतोले, मुंबई

सौ. शुभदा रविंद्र मराठे, इंदौर

पाच्छापूरकर पुरषोत्तम श्रीनिवास, नागपुर

**विशेष देणगी**

श्रीमती रजनी अशोक कोल्हटकर, मुंबई - रु.२,०००

पाच्छापूरकर पुरषोत्तम श्रीनिवास, नागपूर - रु.१,०००

**- संपादक**

लेख २६ वा

**३३३. चतुः शिक्षेत कुक्कुटात्।**

कोंबड्यापासून माणसानें ४ गोष्टी शिकाव्यात.

संपूर्ण सुभाषित :

**युद्धं च प्रातरुत्थानं भोजनं सह बन्धुभिः।**
**स्त्रियामापद्गतां रक्षेत चतुः शिक्षेत कुक्कटात्।**

सतत युद्ध करण्यास सज्ज, सतत लवकर उठणें, गोतवळ्याबरोबरच जेवणें आणि स्त्रियांचे संकटांपासून रक्षण करणें.

**३३४. ज्ञातव्याः षट् शुनो गुणाः।**

कुत्र्यापासून माणसाने ६ गोष्टी शिकाव्यात.

संपूर्ण सुभाषित :

**स्वल्पसंतुष्टः सुनिद्रः शीघ्रचेतनः।**
**प्रभुभक्तश्चं शूरश्चं ज्ञातव्याः षट् शुनो गुणाः।।**

बह्वाशी/अल्पाशी असाहि पाठ आहे.

भरपूर खाणें व जेवढें मिळेल तेवढ्यावर समाधान मानणें, व्यवस्थित (संधी मिळेल तशी) झोप घेणें, चटकन जागे होणें व मालकावर भक्ति असणें, सतत शूर प्रवृत्तीतं वावरणें.

**३३५. त्रीणि शिक्षेत गर्दभात्**

गाढवापासून माणसाने तीन गोष्टी शिकाव्यात.

संपूर्ण सुभाषित :

**अविश्रामं वहेद्भारं शीतोष्णं च न विन्दति।**
**ससंतोषस्तथा नित्यं त्रीणि शिक्षेत गर्दभात्।।**

अविश्रांत मेहनत करून ओझी वाहत राहणें, ऊन, थंडी यांची पर्वा न करणें व सतत संतुष्ट वृत्ती ठेवणें.

**३३६. गते शोको न कर्तव्यो**

झालें गेलें गङ्गेला मिळालें

**गते शोको न कर्तव्यो भविष्यं नैव चिन्तयेत्।**
**वर्तमानेन कालेन वर्तन्ते हि विचक्षणाः।।**

या सुभाषिताचा आशय असलेलं H.W. Longfellow यांच्या Prarm of Life या कवितेतील खालील कडवं पहा :

Trust no future, however pleasent
Let the dead past, bury its dead
Act, act in the living present
Heart within and God overhead

**३३७. सुखःदुःखानुभवः।**
**सुखं हि दुखान्यनुभूय शोभते**
**यथान्धकारादिव दीपदर्शनम्।**
**सुखात्तु यो याति दशां दरिद्रतां**
**स्थितः शरीरेण मृतः स जीवति।।**

ज्याप्रमाणे (गडद) अंधारातून आल्यावर दिवा दिसला की आनंद होतो. त्याप्रमाणे दुःखानंतर आलेले सुख आनंददायी असते.

सुख उपभोगून झाल्यावर येणारे दारिद्र्य फार कठीण असते. कारण मनुष्य जिवंत असूनहि मेल्या सारखाच असतो.

(पृष्ठ १४ वर)

**ॐ्ङ्कारममलेश्वरम् ॥१॥**

ॐ कारेश्वर अथवा अमलेश्वर

ॐङ्कारेश्वर माळवा प्रान्तात (मध्य प्रदेशात) नर्मदा नदीच्या काठावर आहे. उज्जैनहून खांडव्याकडे जाणाऱ्या मिटरगेज लाईनवर मोरटक्का नावाचें स्टेशन आहे. तिथून तें ७ मैल लांब आहे. ॐङ्कारेश्वर व अमलेश्वर अशी दोन वेगवेगळी लिङ्गे आहेत. पण ती एकाच लिङ्गाचे स्वरुप मानतात.

**कावेरिकानर्मदयोः पवित्रे**
**समागमे सज्जनतारणाय।**
**सदैव मान्धातृपुरे वसन्तं**
**ॐ्ङ्कारमीशं शिवमेकमीडे ॥३॥**

अन्वय :- कावेरिका-नर्मदयोः पवित्रे समागमे मान्धातृपुरे सज्जन-तारणाय सदैव वसन्तं ॐङ्कारमीशं शिवमेकमीडे।

अन्वयक्रमानुसार समास, रूपे व शब्दार्थः-
१) **कावेरिका-नर्मदयोः -** कावेरिका नर्मदा च कावेरिकानर्मदे इतरेतर-द्वंद्व समास. कावेरी आणि नर्मदा यांच्या.

२) **समागमे -** समागम (पु.) स. ए. व संगमावर.

३) **मान्धातृपुरे -** मान्धाता इति पुरम् मान्धातृपुरम् विशेषनाम सामान्यनाम कर्मधारय समास तस्मिन्। - मान्धातृपुरांत

टीप - पूर्वी येथे मांधाता हा प्रख्यात शिवभक्त राजा होऊन गेला. ही त्याची राजधानी होती. म्हणून त्या क्षेत्राला 'ओंकारमांधाता' हें नाव पडलें.

४) **सज्जनतारणाय -** सन्तः जनाः सज्जनाः कर्मधारय समास। सज्जनानां तारणं सज्जनतारणम् षष्ठी तत्पुरुष तस्मै। सज्जनांचें रक्षण करण्यासाठी

५) **वसन्तम् -** वस् १ प.प. राहणे कर्तरि वर्तमानकालवाचक धातुसाधित विशेषण पुल्लिंगी द्वितीया एकवचन. राहणाऱ्याला.

६) **ॐ** -अ+उ=ओ (गुण संधि) ओ+म्=ओम्

अ-ब्रह्मा, उ-विष्णू, म-महेश प्रतिकात्मकॐ (ओम्)

७) **ईडे -** ईड् २ आ.प. ईट्टे किंवा १० प.प. ईडयति-वर्तमानकाळ तृ.पु.ए.व. (मी) स्तुति करतो.

**भावार्थ :** कावेरिका आणि नर्मदा ह्यांच्या पवित्र संगमावर असलेल्या मान्धातृपूर येथें सज्जनांचें रक्षण करण्यासाठीं कायम वस्ती केलेल्या ॐङ्कार स्वरुप एका देवाची, शिवाची मी स्तुति करतो.

ह्या क्षेत्राचं वैशिष्ट्य म्हणजे पूर्वी येथें परमार राजा उदयादित्य यानें अमलेश्वर मंदिरांत चार संस्कृत स्तोत्रें शिलालेखांत कोरुन घेतली आहेत. त्यात पुष्पदन्त विरचित 'शिवमहिम्न स्तोत्र' आहें. क्षेत्र अत्यंत निसर्गरम्य आहें.

श्लोकांतील वृत्त 'उपजाति' आहे. उपजाति वृत्ताचे जे १४ प्रकार आहेत त्यातील

(पृष्ठ २० वर)

## 'रुक्मिणी हरण' - वृत्त विबुधप्रिया

राजहंस टिपीत मौक्तिक काक पाहत राहती।
साक्षिला कुलदेवता अन् आप्तही जन भोवती ॥ धृ॥

रक्षिण्या वधुला मनोहर दिव्य दुर्लभ सुंदर।
वारण्या शिशुपाल रुक्मि हरेक संकट सत्वर॥
मंदिराजवळी उभे नयनांत अंजन तत्पर।
सैन्य एक खुणेबरोबर देई जीवन आहुती ॥ १ ॥

दर्शनास्तव रुक्मिणी गिरिजालयी जंव येतसे।
चांदण्यामधल्या नभातिल चंद्रिकेसम ती दिसे॥
भान त्या वधुला हरीविण आणखी कुठले नसे।
भावमग्न वधू पुजे गिरिजेस गाऊन आरती ॥ २ ॥

रुक्मिणी परतोनि येउन मैत्रिणींसह जेधवा।
सज्ज होत रथात आरुढ दीन होउन तेधवा॥
पाहिले क्षण एकमात्रच विश्वमोहन माधवा।
ये रथातुन जो अचानक खुद्द होउन सारथी ॥ ३ ॥

श्रीहरी मग रुक्मिणीजवळीं तिचा कर मागतो।
तातडी करुनीच ती कर देतसे जरि कापतो॥
नाट्य हें घडण्यास ना तरि एकही क्षण लागतो।
अश्व ते रथ घेउनी करुनी त्वरा पथ लंघती ॥ ४॥

काय जें घडलें किती क्षण प्रेक्षकां नच आकळे।
वासुनी मुख मंडलास अतर्क्य पाहत बावळे॥
काळ अंमळ लोटल्यावर मुष्टिसी वळती बळें।
धावती मग क्रोधले सगळे लगेच महारथी ॥ ५॥

त्या क्षणी बलराम आणिक वीर यादव रक्षती।
घोर त्या समरांगणावर पावती रिपु सद्गती॥
वीर यादव ते नव्हे जणु कालभैरव नाचती।
वाचले नर देत त्या बलरामही शरणागती ॥ ६॥

एक केवळ रुक्मि धावत पाठलागच नावरी।
ठाकला करण्यास तुंबळ रुक्मिणी मग बावरी॥
मात त्या सहजींच देउन शुद्ध घालवि श्रीहरी।
उत्तरीय करांस बांधुन देत सोडुन दुर्मती ॥ ७ ॥

अश्वही उरला मजेतच द्वारकापथ धावती।
जीवनी सुख रुक्मिणी हरि मीलनास्तव चालती॥
हासतां परिहासतां गुजगोष्टि मंगल बोलती।
एक प्राणच ज्योतही तरि दोन होउन तेवती ॥८॥

रुक्मिणीसह कृष्णानं द्वारकेंत प्रवेश करतांच समस्त द्वारकावासियांना स्वर्ग दोन बोटं उरला! रुक्मिणीला आपल्या पोटाशीं धरून देवकी म्हणाली, आज माझं घर खऱ्या अर्थानं भरलं! वसुदेवानं तोंड भरून त्या जोडप्याला आशीर्वाद दिले आणि कुंडिनपुरीं दूत धाडून भीष्मक राजाला आणि त्याच्या पत्नीला सादर, सप्रेम बोलवून घेतलं. राजपुरोहितांना बोलवून त्यानं विनंती केली, लग्नासाठी लवकरात लवकरचा शुभमुहूर्त आपण शोधून काढावा.

बलरामासह परतलेल्या सैन्यानं रुक्मिणीहरणाची कथा सर्व द्वारकावासियांना परत परत सांगितली. अनेकदा ती ऐकूनहि त्यांचं समाधान होईना. राजप्रासादांत रुक्मिणीला पहायला एकच गर्दी लोटली. तिला पाहून झालेला आनंद त्यांच्या धन्योद्गारांतून ओसंडू लागला,

आपण स्वर्गातल्या मेनकादि अप्सरांना पाहिलं नाही अशी आता रुखरुख वाटायला नको!

द्वारकेंत लक्ष्मी आणि सरस्वती एकाच कुडीतून नांदायला आल्या बरं का! काय शालीनता!

केवढी नम्रता! माझ्याशीं अगदी वर्षानुवर्षांची ओळख असल्यासारखं बोलली.

या दिव्य जोडप्याला लक्ष्मी -नारायण म्हणावं की रती- मदन हेच कळत नाही. हे जोडपं म्हणजे गृहस्थाश्रमाचा सर्वोच्च मानबिंदूच आहे जणू!

कृष्ण-रुक्मिणीच्या विवाहोत्सवाला सारी द्वारका सज्ज होऊ लागली. घरं झाडून पुसून रंगवली गेली. त्यांच्या दारांवर तोरणं दिसू लागलीं. रस्ते सडासंमार्जित झाले, तऱ्हेतऱ्हेच्या रांगोळया त्यांवर शोभून दिसू लागल्या. निरनिराळया रंगांच्या आणि आकारांच्या पताका नगरीच्या सौंदर्यात भर घालू लागल्या. फुलांच्या माला तयार होऊ लागल्या. विविध झाडपानांच्या प्रेक्षणीय नक्षीसमवेत ठिकठिकाणी त्या डोळयांचं पारणं फेडू लागल्या. नागरिकांनी लग्नसमारंभासाठीं नवीन वस्त्रं शिवून घेतलीं. घराघरांत मंगल वाद्य निनादू लागलीं. गोडाधोडाचे पदार्थ चुलीचुलींवर शिजू लागले. त्यांचा खमंगपणा, फुलं, रस्त्यांवर शिंपडलेलं अत्तरमिश्रित पाणी यांच्या संमिश्र गंधानं आसमंत दरवळूं लागला.

एव्हांना कुंडिनपुराहून राजा भीष्मकहि आपल्या राणीसह द्वारकेला येऊन पोहोचला होता. त्यानहि अतिशय समाधानानं उद्गार काढले, श्रीकृष्णासारखा एकमेवाद्वितीय जावई मोठया भाग्यानंच आम्हाला मिळाला! रुक्मिणी आतां कृष्णापासून दूर, पिता उतरला होता त्या प्रासादांत राहूं लागली. तें प्रेमळ जोडपं एकमेकांना आतां मनःचक्षुंनीं पाहूं लागलं. यथाकाल मधुपर्क, कन्यादान इत्यादि सारे विधि शास्त्रोक्त पद्धतीनं पार पडले.

विवाहाच्या दिवशीं आबालवृद्ध द्वारकावासीय भल्या पहाटेच जागे झाले. सुवासिक स्नान करून, ठेवणीतले कपडे घालून आणि आपल्या आवडत्यांना द्यायला नानाविध भेटवस्तू घेऊन सारे विवाहमंडपांत उपस्थित झाले. मंगल वाद्यांच्या सुरांनीं, सुवासिक अत्तरांच्या सुगंधानं, ठिकठिकाणीं लावलेल्या दीपमालांच्या प्रकाशानं, उपस्थित सर्वांच्या उत्तेजित लगबगीनं, रेशमी आणि भरजरी वस्त्रांच्या सळसळीनं सारं वातावरण धुंद झालं.

उच्च पण मंजुळ स्वरात गायन करत असलेल्या भाटांच्या गायनाचीहि त्यांत श्रवणीय भर पडली...

**'रुक्मिणी स्वयंवर' - वृत्त देवप्रिया**

हे सख्यांनो हे सुखांनो मीलनाला साजऱ्या।
रुक्मिणीच्या माधवाच्या आज या लग्नास या ॥ धृ॥

हे मुलांनो हे फुलांनो टाकण्यां या अक्षता।
देत आशीर्वाद साऱ्या सोहळयाला देवता॥
रुक्मिणीच्या येत आजि सर्व स्वप्नां पूर्तता।
जीव शिवा एकतेची जाणण्या या प्रक्रिया ॥ १ ॥

कौतुकानें देवकी न्याहाळि कन्या लाजरी।
ना कळें कैसी स्पृहावी गौरवर्णी हांसरी॥
द्वारकावासीय होती धुंद मोदें अंतरीं।
हे सुरांनो हे स्वरांनो गाउं या देवप्रिया ॥ २ ॥

संगतीनें श्रीधराच्या अर्थ येई जीवना।
आर्त होई सागराच्या ती नदीहि मीलना॥
भीष्मकादी रुद्ध कंठीं दाटल्यानें भावना।
हे नभीच्या तारकांनो पाहण्या दृश्यास या ॥ ३॥

बोलतीं सांदीपनी मांगल्यकारीं भाषितें।
श्रीहरीनें घालतांना पुष्पमाला सस्मिते॥
पुष्पमाला श्रीहरीला रुक्मिणीहि घालते।

यक्ष आणि किन्नरांनों ऐकण्या वाद्यांस या ॥ ४॥

ब्रह्म-माया द्वारकेला एक आजि होतसे।
पाहुनी तो सोहळा नेत्रांस तृप्ती येतसे॥
जेथ राही कृष्ण कांही न्यूनता तेथें नसे।
पंचप्राणांनों तुम्ही या वंदण्या देवास या ॥ ५॥

कृष्णरुक्मिणीचा लग्नसोहळा कित्येक दिवस पंचक्रोशींत चर्चिला गेला. त्यांची संसारवेल दिसा-मासांनी वाढूं लागली. रुक्मिणीनं आपल्या आदर्श वर्तनानं सर्वांनाच आपलंसं करून घेतलं. द्वारकावासियांच्या सुखाचं माप भरभरून वाहूं लागलं. कृष्णरुक्मिणीच्या संसारवेलीवर लवकरच एका लोभस पुष्पकलिकेचा उदय झाला. जणू दुसरा बाळकृष्णच भासणाऱ्या त्या मुलाचं नाव 'प्रद्युम्न' ठेवण्यांत आलं. त्याच्या संगतींत सर्वांचेच दिवस कसे भुरूभुरू उडून जाऊं लागले.

त्याच सुमारास कृष्णाच्या आयुष्यांत आणखी एक नाटय घडलं.

द्वारकेंत एक सत्राजित नावाचा सामंत रहात होता. सूर्यदेवतेची प्रखर उपासना करून सूर्याकडून त्यानं स्यमंतक नावाचा एक दिव्य मणि प्राप्त करून घेतला होता. हा मणि दररोज दोन भार सोनं देत असे. हे सोनं सत्राजित दान करी. त्याच्या दानशूरत्वाची आणि पर्यायानं स्यमंतक मण्याची कीर्ती दूरवर पसरूं लागली.

वसुदेवाच्या कानावर ही गोष्ट येताच त्यानं कृष्णाला सत्राजिताकडे पाठवलं. कृष्ण सत्राजिताला म्हणाला, सामंत, आपली हरकत नसल्यास वसुदेव महाराजांची एक इच्छा मी आपणास निवेदन करणार आहे.

आपल्या दानशूरतेवर विश्वास असलेला सत्राजित लगेच म्हणाला, मी त्यांची काय सेवा करू शकतो?

त्यावर कृष्ण सहजपणें म्हणाला, आपल्याजवळ असलेला स्यमंतक मणि अगदी सुरक्षित रहावा, चुकून भलत्या हातीं पडूं नये, त्याचा गैरवापर होऊं नये अशीच तातांची इच्छा आहे.

सत्राजितानं साशंक मनानं विचारलं, मग त्यासाठी मी अधिक काय करावं असं त्यांचं म्हणणं आहे?

आपण तो मणि वसुदेव महाराजांच्या स्वाधीन करावा. आपलं सर्व सामर्थ्य पणाला लावून ते त्याचं रक्षण करतील. कृष्णानं उत्तर दिलं.

ते ऐकताच सत्राजिताला धक्काच बसला. क्षणभर विचार करून तो निग्रहानं म्हणाला, अशक्य! माझी सर्व पुण्याई पणाला लावून मी तो सूर्याकडून प्राप्त केलाय. स्यमंतक मला माझ्या प्राणांपेक्षाहि अधिक मोलाचा, अधिक प्रिय आहे. कदापिहि मी तो वसुदेव महाराजांना देणार नाही!

कृष्णानंहि सत्राजिताच्या इच्छेला मान देऊन त्याचा निरोप घेतला.

मात्र सत्राजिताच्या मनांत शंकाकुशंकांनी हैदोस घालायला सुरूवात केली...

**प्रसाद दि. औटी**
न्यू अजंठा अव्हेन्यू, बि. नं.३ बी.-१,
६ वा मजला, ब्लॉक नं. १८,
पौड रोड, कोथरूड, पुणे - ४३३ ०३८
दूरध्वनी : ०२०-२५४५००८९
मोबाइल : ९८८११०४०७४

●●●

## ११. विजेसारखा चमकणारा मोठ्ठा मुलगा

काश्यपाच्या आश्रमांत वामनाचें वेदाध्ययन चालू होतें त्याच सुमारास बलिराजानें नर्मदेच्या कांठीं एक छोटीशी क्रीडानगरी नुकतीच वसविली होती. त्यानें तिचें नांव मायानगरी असें ठेविलें होतें.

बलिराजा आधींच विलासी, सुखोपभोग घेण्यांतच जीवनाचें सर्वस्व आहे. असें मानणारा. मग मुद्दाम विश्रामासाठीं म्हणून वसविलेली त्याची ही मायानगरी म्हणजे विषयांचें तें केवळ आगरच असल्यास त्यांत नवल नाहीं.

मायानगरीची योजना आंखतांना मयासुरानें आपल्या कल्पकतेची शिकस्त केली होती. आंतील सर्व रस्ते रुंद व रेखीव असून गुढ्यातोरणांनी सदा शृंगारलेले असत. त्यांच्या दोन्ही बाजूंस दैत्यश्रेष्ठींसाठीं सुंदर सुंदर विलासमंदिरें बांधलीं होतीं. प्रत्येक मंदिराच्या धाटणींत नावीन्य साधलें असल्यामुळें तीं पाहातांना मन रमून जाई.

मंदिरांच्या सभोवार सुंदर उद्यानें होतीं. त्यांतील नाना प्रकारचीं फुलझाडें त्यांच्यावर बसलेल्या फुलपांखरांमुळें अधिकच मनोहर दिसत.

मंदिरांच्या खिडक्यादरवाजांना मखमलीचे पडदे लावलेले असत. त्या मंदिरांतून कोठें नाट्य, प्रहसन, अक्षक्रीडा, तर कोठें नृत्य, गायन, वादन वगैरे चालू असे. आंतून नेहमीं हास्याच्या लकेऱ्यांवर लकेऱ्या ऐकूं येत. त्यामुळें ती नगरी सदा आनंदानें बहरलेली असे.

तेथील रस्त्यांवरुन नित्य नवे नवे पोशाख घालून फिरणाऱ्या तरुण स्त्रिया एकमेकींशीं चतुरपणें बोलत आणि हसत खिदळत जवळून जाऊं लागल्या कीं त्यांच्या अंगाला फासलेल्या सुगंधी द्रव्यांचा वास भपकन् येई. त्या निघून गेलयावरही त्यांच्या डोकींतून गळून पडलेल्या जाई. चमेली इत्यादि फुलांचा संमिश्र वास त्यांच्या मागें दरवळत असे. त्यामुळें मायानगरीच्या त्या रस्त्यांवरून जाणारांना आपण नंदनवनांतच आहों असा भास होई.

त्या नगरींत एका बाजूस उंचवट्यावर खुद्द राजासाठीं एक रमणीय मंदिर बांधलें होतें. तें शुभ्र स्फटिकांनी बनविलेलें होतें. खिडक्या व दारें सोन्याचीं असून वर रत्नें जडविलेलीं होतीं. त्यामुळें त्या विलासमंदिराकडे पाहाणाराचे डोळे दिपून जात.

पण त्या मंदिराचा विशेष म्हणजे त्याची अद्भुत रचना. मयासुरानें आपलें सारें कसब खर्ची टाकून तें बनविलें होतें. त्याची उंची फार नव्हती. तरीसुद्धां मंदिराच्या कोणत्याही बाजूच्या सज्जांत उभें राहून सभोंवार पाहिलें असतां आपण कितीतरी अकल्पित उंचीवर उभे आहोंत असें वाटे.

नगरींतील प्रत्येक हालचाल तेथून नजरेस येई. पण मौज ही, कीं तेथें उभें असलेलें माणूस मात्र बाहेरील कोणास कोठूनही दिसत नसे.

अशा त्या विलक्षण मायानगरींत सध्यां बलिराजाचा वास होता.

दक्षिणापथाचा सार्वभौम राजा तर तो झालेलाच होता. आतां अवघ्या जंबुद्वीपावर स्वामित्व गाजविण्याची त्याला महत्त्वाकांक्षा होती.

त्यासाठीं कांहीं विशिष्ट सिद्धि आवश्यक होत्या. त्या मिळविण्यासाठीं त्याचा गुरु शुक्राचार्य विंध्यपर्वतावर तपश्चर्येला गेला होता. जातांना जंबुद्वीपाच्या स्वामित्वाची कामना मनांत धरून एक महायज्ञ करण्यास त्यानें बलीला सांगितलें होतें.

त्याप्रमाणें बलिराजानें आतां तो यज्ञ मायानगरींत नर्मदेच्या तीरीं सुरु केला.

यज्ञासाठीं नदीकांठच्या विस्तीर्ण पटांगणांत एक भव्य मंडप उभारला होता. चारी बाजूंस विस्तीर्ण द्वारें ठेवून त्यांत अशोकपल्ल्यांच्या शोभिवंत महिरपी उभारल्या होत्या. मंडप आंत व बाहेर आम्रपताकांनीं सुशोभित करून ठिकठिकाणीं नाना प्रकारच्या फुलांची तोरणें बांधलीं होतीं. त्यांतील बकुळ, चंपकादि फुलांच्या सुवासानें सारा मंडप दरवळून जाई,

यज्ञवेदी पन्नास हात लांब व पंचेचाळीस हात रुंद असून संपूर्णपणे सोन्यानें मढविली होती !

यज्ञमंडपाला लागूनच यज्ञीयद्रव्यांची कोठारेंच्या कोठारें भरुन ठेवलीं होतीं.

पौरोहित्य अर्थातच शुक्राचार्याच्या पुत्राकडे होतें. शुक्राचार्याच्या कच्छपीं असलेल्या ऋषींची ऋत्विजांच्या जागीं नेमणूक झाली होती.

सूर्योदयापासून माध्यान्हीपर्यंत यज्ञकर्म चाले. त्या वेळीं ऋत्विजांची आणि हविर्द्रव्यांची नेआण करणाऱ्या असंख्य सेवकांची एकच गडबड सुरू होऊन सारा यज्ञमंडप गजबजून जाई.

ऋत्विज आणि यज्ञासाठीं आलेले अगणित ऋषि ह्यांच्यासाठीं यज्ञमंडपाशेजारीं वेगवेगळ्या पाकशाला उभारल्या असून त्यांत त्यांना मिष्टान्नांचें भोजन आग्रहपूर्वक घालण्यांत येऊन वर विपुल दक्षिणा दिली जाई.

बलिराजाच्या अद्‌भुत अशा ह्या मायानगरीची कीर्ति आधींच चारी दिशांना पसरली होती. त्यांतच आतां हा महायज्ञ सुरू झाल्याचें कर्णोपकर्णी होऊन हजारों प्रजाजन नगरी व यज्ञ पाहाण्यासाठीं सर्व बाजूंनीं तेथें लोटूं लागले.

त्यांच्यासाठीं मायानगरींत मुक्तद्वार ठेवलें होतें एवढेंच नव्हे, तर राजानें स्वतःच्या देखरेखीखालीं त्या सर्वांना मिष्टान्नांचे पोटभर जेवण व गोरगरिबांना त्याबरोबर वस्त्रदान मिळण्याचीही व्यवस्था मुद्दाम करविली होती.

त्यामुळें मायानगरींत आलेला प्रत्येक माणूस ''काय हो हें वैभव ! किती हो हें वैभव ! किती हो ह्या बलीचें औदार्य !!'' असे उद्‌गार काढीत बलिराजाचा मिंधा होऊनच तेथून परत जाऊं लागला.

अशा प्रकारें यज्ञाच्या निमित्तानें मायानगरींत प्रजाजनांची धुमश्चक्री चालू असतां, एके दिवशीं बलिराजा आपल्या विलासमंदिराच्या महालांत शुक्राचार्याच्या पुत्राशीं बोलत बसला होता. पट्टराणी विंध्यावली बाजूला उभी होती. त्यांची लहान चार वर्षांची कन्या माया, बाहेरच्या बाजूस सज्जांत नगरीची मौज पाहाण्यांत दंग होती.

पोर मोठी चुणचुणीत असल्यामुळें सर्वांची लाडकी होती. बलिराजाला तर तिच्याशिवाय एक क्षणभरही गमत नसे.

राजा पुरोहिताशीं बोलण्याच्या ऐन रंगांत आला होता. इतक्यांत माया बाहेरुन, ''तात, तात,'' असें म्हणत एकदम धावत धावत आंत आली, समोर मंचकावर बसलेल्या राजाजवळ जाऊन त्याच्या पायांत घुसली आणि आपल्या लहानग्या हातांनीं त्याच्या कंबरेला विळखा घालून ती त्याच्याकडे आशाळभूत नजरेनें पाहूं लागली.

राजानें लगेच ओळखलें कीं हिच्या मनांत कांहींतरी खळबळ उडाली आहे. पण आपण पुरोहिताशीं बोलत असल्यामुळें मध्येंच बोलूं नये ह्या जाणिवेनें पोर संयम करीत आहे. तेव्हां आपलें भाषण तसेंच अर्धवट टाकून राजा कन्येच्या तोंडावरून हात फिरवीत, तिला कुरवाळून म्हणाला, ''बाळ, काय झालं? अशी धावत कां आलीस?''

आतां मायेला कुठला धीर? राजाचा हात आपल्या दोन्ही हातांत घेऊन त्याला ओढीत घाई घाई करून ती म्हणाली, ''तात, तात, बाहेर पाहायला चला. चला ना...''

राजाला पोर ओढते आहे असें पाहून विंध्यावली रागाचा आविर्भाव आणून तिला म्हणाली, ''माये, काय आहे तें आधीं सांग. सोड हात. मोठ्या माणसांना असं ओढूं नये.''

पण मायेची दृष्टि राजाच्या डोळ्यांकडे होती. राजा तिच्याकडे कौतुकानें पाहात होता. मग ती आईचें कां ऐकेल?

माया राजाला म्हणाली, ''बाहेर यज्ञमंडपापाशीं एक मोठ्ठा मुलगा उभा आहे. विजेसारखा चमकतो. अहो, त्याच्या हातांत भिक्षापात्र आहे. तात, मी जाऊं का त्याला भिक्षा घालायला? तुम्ही पण चला. आपण त्याला खूप खूप भिक्षा घालूं.'' असें म्हणून माया राजाला पुन्हा ओढूं लागली.

तेव्हां राजा तिच्या पाठीवरून ममतेनें हात फिरवीत म्हणाला, ''बरं हं बाळ, आपण त्याला खूप खूप भिक्षा घालूं. थांब. आपण त्याला इथें बोलावून आणूं.'' असें म्हणून राजानें दाराशीं उभ्या असलेल्या एका सेवकाला यज्ञमंडपाकडे जाऊन त्या मुलाला घेऊन येण्याची आज्ञा केली.

मायेला कुठला धीर? तीही त्या सेवकाच्या मागोमाग धावतच बाहेर गेली.

## १२. 'तीन पावलं भूमि दे'

वामनाचा आपल्या मातेशीं बलिराजासंबंधींचा संवाद झाला तेव्हांपासून बलिराजाला आपण एकदां समक्ष पाहवें अशी वामनाला उत्कंठा लागली होती.

बलिराजानें मायानगरींत यज्ञसत्र सुरू केलें आहे असें समजल्यावर, पित्याच्या संमतीनें, वामन एके दिवशीं भिक्षाटनासाठीं म्हणून जो आश्रमांतून निघाला तो झपाझप पावलें टाकीत सरळ त्या मायानगरींतील यज्ञमंडपाच्या द्वाराशीं येऊन ठेपला.

त्याच्या हातांतील भिक्षापात्र पाहून द्वारपाल त्याला पाकशालेचा मार्ग दाखवीत आहेत तोंच बलिराजानें आपल्या महालांतून धाडलेला सेवक

तेथें आला आणि वामनाला आपल्याबरोबर राजापाशीं घेऊन गेला.

माया त्यांच्या मागोमागच होती.

महालांत पाऊल टाकतांक्षणींच वामनानें 'ॐभवति भिक्षान्देहि।' असें खड्या आवाजांत म्हणून आपलें भिक्षापात्र राजाच्या पुढें केलें.

त्याला पाहतांच राजा चपापला. प्रत्यक्ष मध्यान्हींचा सूर्यच आपल्यासमोर तळपत आहे असा क्षणभर त्याला भास झाला.

राजपुरोहित, विंध्यावली व तेथें असलेले सारे सेवकही वामनाकडे पाहून त्याच्या तेजानें स्तिमित झाले आणि हा तेजस्वी मुलगा कोण असावा म्हणून नाना प्रकारें तर्क करूं लागले.

वामनाच्या हातांत भिक्षापात्राखेरीज दंड, छत्र व पाण्याचा कमंडलु होता, कंबरेला दर्भाची मेखला बांधली असून त्यानें आपल्या अंगावर उजव्या कांखेखालून डाव्या खांद्यावर कृष्णाजिन घेतलें होतें. गळ्यांत रुद्राक्षाची माळा शोभून दिसत होती.

त्याचे सारे अवयव रेखीव व सुबक होते. डोळे पुंडरिकाप्रमाणें तेजस्वी असून मुख पूर्णचंद्राप्रमाणें प्रफुल्लित होतें.

त्याची 'भिक्षान्देहि'ची आरोळी ऐकून बलिराजानें अगदीं सहजपणें त्याला विचारलें,

''बाळा, तुला काय हवं?''

राजाच्या नजरेशीं नजर भिडवीत वामनानें उत्तर दिलें, ''राजा, बटुव्रताला अनुसरून भिक्षा घेण्यासाठीं मी बाहेर पडलों आहे. मला भिक्षा हवी.''

वामनाच्या वाणींत प्रभुत्व होतें. त्याचें भाषण ऐकतांच हा कोणी सामान्य बटु नव्हे अशी खात्री वाटून राजा म्हणाला, ''बटो, ठीक आहे. तर गाई, सोनं, घरदार, हत्ती, घोडे, रथ, भूमि ह्यांपैकी कोणती भिक्षा तुला घालूं तें सांग. तुला पाहून मी खूष झालों आहें. तुला हवी ती भिक्षा मी घालीन.''

वामनानें चटकन् उत्तर दिलें, ''राजा, तूं म्हणतोस त्यांपैकीं सध्यां मला कशाचीही गरज नाहीं. जरुर असेल त्याचाच स्वीकार करावा अशी मला माझ्या गुरुची आज्ञा आहे. तर आजच्या निर्वाहापुरत्या धान्याची भिक्षा मला घाल, म्हणजे पुरे.''

वामनाचें भाषण ऐकून राजाला प्रथम हसूंच आलें. विषयोपभोग घेऊन देहाला तोषवीत असावें अशा विचारांचें प्राबल्य आतां आपल्या राज्यांत झालें असतां, अल्पसंतुष्टतेची असली भाषा अजून कोणाच्या तोंडीं असावी ह्याचें बलिराजाला अतोनात आश्चर्य वाटलें.

खास, पुराण विचारांना बिलगून असणाऱ्या एखाद्या वेडगळ ऋषीचा हा मुलगा असावा असें मनांत म्हणून, वामनाचा उपहास करीत तो म्हणाला, ''पोरा, लंगोटी लावून बसण्याचे दिवस आतां राहिले नाहींत. उलट गरजा वाढवून त्या भागवीत राहाण्यांतच ह्या बलिराजाच्या राज्यांत पुरुषार्थ मानला जातो, हें ध्यानांत ठेव. मुला, बापानें पढविलेल्या वेडगळ कल्पना आतां सोडून दे. सांग, मीं म्हटलेल्या वस्तूंपैकीं तुला काय हवं?''

आपल्या गुरूची निंदा ऐकून वामनाला सात्त्विक संताप आला. त्वेषानेंच त्यानें राजाला

उत्तर दिलें, ''राजा, मी बटु आहें. ज्ञान मिळवणं ही एकच गोष्ट मी जाणतों. त्याखेरीज दुसऱ्या कशाकडे ढुंकूनसुद्धां पाहाण्याची माझी इच्छा नाहीं,

''राजा, रोजच्या निर्वाहाला आवश्यक असलेल्या वस्तूंखेरीज अन्य कशासही बटु शिवत नसतो.''

वामनाचें हें निःस्पृह भाषण त्या गर्विष्ठ राजाच्या कानांत तापल्या तेलाप्रमाणें जळजळत गेलें. त्याच्याच महालांत त्याच्या तोंडावर इतक्या सडेतोडपणानें उत्तर देणारा माणूस आजपर्यंत त्याला कोणी भेटला नव्हता!

आणि त्यांत हा तर केवळ पोर !!

तेव्हां संतापानें लाल होऊन तो भुंवया चढवीत वामनाला म्हणाला, ''पोरा, ज्याच्या नुसत्या कृपाकटाक्षासाठीं मी मी म्हणणारेसुद्धां लाळ घोटीत असतात, तो हा दक्षिणाधिपति बलि तुला आग्रहानें देत असतों, तूं त्याच्या देणगीचा बेगुमानपणें अव्हेर करत आहेस तर तुला काय म्हणूं? मूर्ख कुठला !''

बलिराजाच्या त्या दर्पोक्तीमुळें वामनाचा स्वाभिमान डिंवचला गेला. त्याची मुद्रा अस्थिर झाली.

पण तिकडे दुर्लक्ष करून तो मदांध राजा अधिकच तिरस्कारानें वामनाला म्हणाला, ''अरे मठ्ठ पोरा, माझ्यापाशीं दान घेण्यासाठीं आलेल्या माणसाला पुन्हा जन्मांत कुणाजवळ याचना करण्याचा प्रसंग येत नसतो. माझ्या ह्या अलौकिकाला तूं हरताळ फासूं पाहातोस काय?

''मूर्खा, निदान उपजीविका चालेल एवढी भूमि तरी मागून घे.'' असें वर उपहासानें म्हणून बलीनें वामनाकडे तुच्छतेचा एक कटाक्ष फेंकला.

त्या कटाक्षामुळें वामनाच्या जखमेवर मीठ घातल्यासारखें झालें. त्याचा संताप अनावर झाला. पण हातांत वागवीत असलेल्या दंडाची जाणीव होऊन त्यानें संयम केला.

सभोंवार भेदक दृष्टीनें पाहात तो मोजक्या शब्दांत धीरगंभीरपणें राजाला म्हणाला, ''ठीक आहे राजा, तीन पावलं भूमि मला दे.''

असें म्हणून वामनानें किंचित् स्मित करून आपला उजवा हात दान घेण्यासाठीं त्या गर्विष्ठ राजाच्या पुढें केला.

आतां मात्र ह्या पोरास माथेफिरु म्हणावें कीं मूर्ख समजावें राजास कळेना.

म्हणून तो त्याला कुत्सितपणें म्हणाला, ''पोरा, तृष्णा काबूंत ठेवा, गरजा कमी करा, त्याग करा, असं सांगत फिरणाऱ्या एखाद्या ऋषीचा मुलगा शोभतोस खरा. अरे अनूप, कलिंग, केरल, द्रविड ह्यांपैकीं म्हणशील त्या देशाचं राज्यही देण्यास समर्थ असलेल्या ह्या पृथ्वीपति बलिराजाजवळ तीन पावलं जमिनीचा तुकडा काय मागतोय? मूर्खा, नीट विचार कर.''

संयमानें पुन्हा आपला संताप आंवरीत वामन धिमेपणानें राजाला म्हणाला, ''राजा, उपजीविका चालेल एवढी भूमि तरी मागून घे, असं तूंच ना म्हणालास? माझ्या उपजीविकेसाठीं तेवढी भूमि पुरे आहे.''

असें म्हणून वामनानें आपला हात उदकासाठीं पुन्हा राजापुढें केला आणि त्याच्या डोळ्याला डोळा भिडवीत, समरांगणावर उभ्या

असलेल्या एखाद्या वीराप्रमाणें गर्जना करीत तो बलीला पुढें म्हणाला, ''तर दे, राजा, तीन पावलं भूमि मला दे आणि दानशूरत्वाच्या आपल्या लौकिकांत भर घाल.''

आतां मात्र बलिराजाला कोंडित सांपडल्यासारखे ंझालें. उदकासाठीं हात पुढें करून वामनानें त्या बलिष्ठाला जणूं आव्हानच दिलें होते.

आव्हान न स्वीकारणे बलीसारख्या गर्विष्टाला अशक्य होतें.

म्हणूनच दानाचें उदक सोडण्यासाठीं तो पाण्याची झारी पाहूं लागला.

इतका वेळ राजपुरोहित हा सारा प्रकार निमूटपणें पाहात होता. आतां अस्वस्थ होऊन तो बलीला म्हणाला, ''राजा, बटूच्या एकंदर वर्तनावरून हा कोणी तरी मायावी पुरुष अथवा आपल्या शत्रूंनीं धाडलेला एखादा कपटवेषधारी हेर तरी असावा, असं मला वाटतं. राजा, तूं त्याच्या हातावर उदक सोडूं नकोस...''

पण आपण अवघ्या दक्षिणापथाचे स्वामी आहोंत आणि दानशूर म्हणून दिगंतांत आपला लौकिक आहे, अशा दिमाखानें मुसमुसणारा तो बलिराजा पुरोहिताच्या सल्ल्याची थोडीच पर्वा करणार? त्याच्याकडे तिरस्कारानें पाहात आपल्या मानेच्या नुसत्या एका झटक्यानेंच राजानें त्याचें बोलणें मध्येंच थांबविलें आणि विंध्यावलीच्या हातांत असलेली सुवर्णाची झारी बटूच्या हातावर उदक सोडण्यासाठीं आपल्या हातीं घेतली.

**कै. गुंडोपंत हरिभक्त**

●●●

(पृष्ठ क्र. ४ वरून..**संस्कृत सुभाषितांचे अंश व समानार्थी म्हणी, वाक्प्रचार ...**)

**३३८. महानपि प्रसङ्गेन नीचं सेवितुमिच्छति।**

अडला हरी गाढवाचे पाय धरी.

सुभाषिताची पहिली ओळ :

**गणेशःस्तौति मार्जारं स्ववाहस्याभिरक्षणे।**

स्वतःच्या वाहनाचे रक्षण करण्यासाठी गणेशाला मांजराची खुशामत करायची वेळ येते. प्रसङ्ग पडला म्हणजे मनुष्य कितीही मोठा असला तरी त्याला सामान्य माणसाचे पाय धरण्याची वेळ येते.

**३३९ . कष्ठचामीकरन्याय**- काखेंत कळसा अन् गावाला वळसा. गळ्यातील सरात नथ अडकलेली असून तिचा गावभर शोध करणे.

इति शम्।

(क्रमशः)

**दि. दा. औटी**
शिवकृपा, घर नं. ७३,
मु. पो. मुद्रे खुर्द, ता. कर्जत,
जि. रायगड - ४१० २०१
दूरध्वनी : ०२१४८-२२११०९
मोबाइल : ९४२००५९५७४

●●●

# उतार वयातील एकटेपण सुसह्य कसे होईल ?

प्रकाश दीक्षित

उतार वयाची व्याख्या व्यक्ति गणिक बदलणारी आहे. याचे कारण प्रत्येक स्त्री/पुरुषाची शारीरिक, बौद्धिक, मानसिक क्षमता वेगवेगळी असते. उतार वय ही संकल्पना या तिन्ही क्षमतांवर अवलंबून असते. त्यामूळे या सर्वांचा एकत्रितपणे विचार आपल्याला करावा लागेल. प्रत्येकाची उतार वयाची भावना सुरू होण्याचे वय निराळे असू शकते. हे लक्षांत घेता एकटेपण सुसह्य होण्याचे मार्ग वेगळेच असतात हे नक्की. जन्मा पासून बालपण, यौवन, वैवाहिक जीवन, व कार्यकाल यात एकटेपण फारच क्वचित जाणवतो. पण निवृत्ती नंतर वेळेचे जे मोकळेपण येते, त्या मुळे एकटेपण प्रकर्षाने जाणवते. जाणीव होताच प्रयत्नपूर्वक योग्य दिशेने विचार केल्यास ते कमी करणे सहज शक्य आहे. पाहू बघू असे म्हणत वेळ दवडला तर हे करणे कठीण होते. गृहिणी/महिलांच्या मानाने नोकरी/धंदा करणाऱ्या, पुरूषांना निवृत्तीनंतर हा एकलेपण अधिक जाणवताना दिसतो. गृहिणींना घरातील सदस्यासाठी दैनंदिन पोट्य-पाण्याची व्यवस्था करण्यात व्यस्त असल्याने एकलेपण कमी जाणवतो. पण जावई/सुना आल्या नंतर वाढत्या वया बरोबर ते अधिक जाणवू शकतो. या सर्व स्तरावर विचार करणे गरजेचे आहे. नेहमीच एकटेपणा जाणवू लागल्यानंतर यावर उपाय शोधणे, हे तहान लागल्यानंतर विहीर खोदण्यास सुरवात करण्यासारखे आहे. प्रत्येकाने आपले उतारवय येणारच आहे हे लक्षांत ठेवून आपण आपले जीवन संघर्षात प्रामाणिकपणे न्यायवृतीने कार्य केले असेल तर आपण कमी शत्रू व अधिक मित्र परिवार जमवू शकतो. हा विचार चाळीशीचा चष्मा लागतांच सुरू व्हायला हवा. तरच याचे सकारात्मक, समाधानकारक उत्तर सांपडू शकते. ही गोष्ट चाळिशीतील सर्वांनी लक्षांत ठेवली पाहिजे.

हे एकलेपण सुसह्य होण्यासाठी प्रथम आपण एकटेच जन्माला आलो आहोत, आपण मिळवलेले/कमावलेले सगळे स्थावर-जंगम येथेच सोडून जाणार आहोत. हे अबाधीत सत्य मनापासून मान्य केले/स्वीकारले पाहिजे, तरच ह्याचे उत्तर शोधणे सोपे होईल. अन्यथा ते शोधणे अधिक गुंतागुंतीचे होते, यामुळे मोठे नैराश्य येऊ शकते.

स्त्री/पुरुष यांच्यातील शारीरिक मानसिक मनोव्यवहारात फार मोठे फरक आहेत हे लक्षांत ठेऊनच उत्तर शोधता येईल. तसेच आपण आस्तिक असू वा नास्तिक, नियतीचे अस्तित्व आपणास नाकारता येईल कां? जीवन हसत खेळत जगायचे कीं रडत खडत, याचा एकदा आपल्याला निर्णय घेता आला तर ते सुखाने जगण्याचा आनंद आपण मिळवू शकतो. शारीरीक व्याधी कोणालाही चुकवता येत नाहीत हेच खरे आहे. पण स्वार्थ, मद, मत्सर, क्रोध, द्वेष व अहंकार या षड्रिपुंनी, आपणांस आपल्या गत जीवनात दिलेले त्रास लक्षांत घेऊन, विचार केला व मानसिक स्वास्थ्य असेल, तरी आपणास मानसिक व्याधी पूर्णपणे टाळता येत नाहीत. पण त्याची तीव्रता आपण नक्कीच कमी करू शकतो. दुसर्याचे म्हणणे ऐकुन घेण्याची मानसिकता असणे हा चांगला गुण आहे. तो असेल तर उत्तमच, पण नसेल तर तो उतार वयाकडे वाटचाल सुरू

होतानांच या दिशेने प्रयत्न होणे गरजेचे आहे. जगी सर्व सुखी असा कोण आहे ही समर्थ उक्ती लक्षांत ठेवून मार्गक्रमण केल्यास उतार वयांत आपले जगणे सुसह्य होण्यास नक्की मदत होईल.

एकटेपण ही मानसिक अवस्था आहे हे मान्य करणे महत्वाचे. मी निराधार आहे हा विचार मनांत येणे हा एकटेपण जाणवू लगल्याची खूण असते. त्या कडे वेळेवर लक्ष दिले नाही तर मानसिक दुर्बलता येते. आपण आपल्या आयुष्यात मोठ्या चुकाच केल्या आहेत, असे वाटत असले तरी ते खरे नसते. तरीही आपण एकटेपडलो आहोत ही भावना मनांत घर करु लागते. कोणाच्याही कडून फक्त चुकाच घडतात असे नसते. चुका होत असतांनाही कळत नकळत कांही चांगल्या गोष्टीही घडत असतात. चुका करण्यात जेव्हढा त्याचा सहभाग असतो तितकाच तो त्या वेळच्या परिस्थितीचाही असतोच. सर्वस्वी त्या व्यक्तीचा दोष क्वचितच असतो. उतार वयांतील एकटेपण सुसह्य होण्या साठी त्या व्यक्तिलाच प्रयत्न करावे लागतात हे मात्र खरे आहे.

एकटेपण जाणवणाऱ्याचे दोन गट पडतात. एकटेपणाची जाणीव अधिक प्रकर्षाने होणारा एक गट, म्हणजे उतार वयात एकटे राहणारे विवाहित, अविवाहीत व दूसरा विवाहित जोडपी. दोघांचे प्रश्न/ समस्या बहुतेक सारख्या असल्या तरी पहिल्या गटातील व्यक्तींच्या बाबत कांही प्रमाणात वेगळ्या असतात. कारण पहिल्या गटाला सर्व अर्थाने एकटेपण निभवावे लागते, पण जोडप्यांना एकमेकाची साथ सोबत असतेच, पण तसे नसेल तर तेही पहिल्या गटात मोडतात. पहिल्या गटाचे प्रश्न समस्या दुसऱ्या गटांतील व्यक्तीच्या मानाने कांही प्रमाणात अधिक असतात. कारण पहिल्या गटातील व्यक्तींना कोणाची तरी साथ सोबत शोधावी लागते. दुसऱ्या गटांत प्रश्न कांहीसे वेगळे असतात कारण विवाहोत्तर मिळालेला सहकारी अनेक वर्षे बरोबर असल्याने त्याचे गुणदोष एकमेकांना माहीत असतात. त्यामूळे संवाद असतो. तो कायम सुसंवाद राखणे यासाठी दोघांना सोपे होते. विसंवाद असेल तर मात्र दोघांची कुचंबणा अनिवार्य असते. संवाद असेल तर मात्र एकटेपणाचे प्रसंग क्वचितच येतात.

प्रत्येक व्यक्तिला पहिल्या पासून कांही छंद, आवडी असतील तर त्याला एकटेपणा तो आपले छंद आवडी जोपासून तो घालवता येतो. पण असे नसेल तर त्याने प्रयत्न पूर्वक ते शोधून जोपासले तर मार्ग सापडू शकतो. शारीरिक व मानसिक स्वास्थ्य साथ देत असेल तर, आपल्या आवडीचे काम शोधून ते स्वीकारणे हा उत्तम पर्याय ठरू शकतो. ते करतांना आपला एकटेपण कसे पळून जाईल ते कळणारही नाही. जर आधी पासून विचार केला असेल तर ते सोपे होते नाहीतर शोध घेण्यासाठी वेळ द्यावा लागतो. जर जाणीव पूर्वक प्रयत्न केले तर यश येतेच. आपण हे करताना आपले सहकरी, जवळचे नातेवाईक, मित्र-मंडळी यांची मदत मिळाली, घेता आली तर ते जरूर करावे. दैनंदिन गरजा भागविण्याची तरतूद आधीच केलेली असेल, व आपण आस्तिक असाल, तर अध्यात्मात रस घेतला तर एकटेपण वाटणे कमी होऊ शकते. नाही तरी वानप्रस्थाश्रमात अध्यात्म, देव देव करणे आपल्या परंपरेत आहेच. केवळ दुसरा करतो म्हणून त्याचे अनुकरण कधीच करू नये. आपला कल कुठे आहे याचा विचार आणि

(पृष्ठ २० वर)

(लेखाचा उर्वरित भाग मागील अंकावरून पुढे...)

तेव्हां गणपति उपासना ही मूळची वैदिकच आहे. पुराणोक्त नाही. पुराणांनी त्यात पदरची भर घातली एवढेच. वेदांनी गणपतीचे श्रेष्ठत्व मानले आहे - ''न ऋते त्वक्रियते किंचनारे'' म्हणजे तुझ्यावाचून आम्ही काहीहि करूं शकत नाही. म्हणूनच देवादिकांनीसुद्धा कार्यारंभी गणेशपूजन केलेलें आहे. कार्य मग तें कोणतेंहि असो- पारमार्थिक वा व्यावहारिक, त्याचें निर्विघ्नपणें फळ मिळावें, त्यांत निर्विघ्नपणें यश मिळावें म्हणून गणपति पूजन केले जाते. कारण तो जसा विघ्नहर्ता आहे तसाच विघ्नकर्ताहि आहे. दुष्टांचे हेतू सफल न होण्यासाठीं तो विघ्न निर्माण करून त्यांचे दुष्ट मनोरथ धुळीस मिळवतो तर सज्जनांचें कार्य सफल होण्यासाठीं तो विघ्नें येऊंच देत नाही म्हणजेच त्याचेपाशी या दोन्ही शक्ति आहेत. ज्या इतर दैवतांमध्ये नाहीत. त्यामुळे त्याचें श्रेष्ठत्व सिद्ध होतें.

गणपतिअथर्वशीर्षांत ''त्वं मूलाधारस्थितोऽसि नित्यम्।'' हा उल्लेख फार महत्त्वाचा आहे. मानवी देहात जी षट्चक्र आहेत त्यातील मूलाधारचक्रांत गणेश ही नित्य स्थित देवता आहे. या मूलाधारावरच सर्व सजीव निर्जीव पदार्थ आपला गुरुत्वमध्य पकडतात वा तो तेथे असतो त्यामुळेच ते स्थिर राहू शकतात. हा पाया आहे तेव्हा त्याचा आधार महत्त्वाचाच नव्हे तर अत्यावश्यक. सर्व सजीव निर्जीवांचा समतोल राखणारी ही एकमेव शक्ती आहे व तिलाच गणपति म्हणतात. तेव्हा विश्वाची मूलाधारशक्ती गणपति च आहे. म्हणूनच ती सर्वश्रेष्ठ. मूलापासूनच सर्व डोलारा उभा राहतो हें आपण वृक्षाचें उदाहरण घेतलें तर सहज लक्षांत येईल. तोच अर्थ अधिक व्यापक स्वरुपांत येथे आहे. अथर्वशीर्षांत गणेशमूर्ति संकल्पना ॐकारस्वरुपच आहे. त्यात गणेशाचा एकाक्षर मंत्र आहे, जो सर्व सारस्वतांचे व नद्यांचे जणू उगमस्थानच आहे. ''ॐ गं'' हा तो मंत्र. याचें मंत्र सामर्थ्य अनाकलनीय, अतुल्य व कल्पनातीत वेगाचे असते.

गणपतीचे खरे रुप ॐकार. बाकीची सर्व काल्पनिक वा पुराणोक्त. तेव्हा ॐकार ध्वनिरुप, वेदांच्याहि आधीचा म्हणूनच गणपति आद्य, जेष्ठतम व प्रथमपूजनीय सर्वश्रेष्ठ. श्रुतीमध्यें ॐकार रुप हेंच गणेशरूप वैज्ञानिक आहे असें सांगितले आहे. ती श्रुति अशी आहे - ''ततश्चोमितिध्वनिरभूत्। स वै गजाकारः। अनिर्वचनीया सैव माया। जगद्वीजमित्याह सैव प्रकृतिरिति गणेश इति प्रधानमिति च मायाशबलमिनि च।'' व हे ध्वनिरुप एकाक्षर मंत्र-जपानें साक्षात्कार देऊ शकते.

शिवपुराणांत जी कथा आहे ती येथें संक्षेपानें देत आहे. ती श्रीगणेश जो ॐकार रुप आहे, तोच सर्वश्रेष्ठ आहे याच्या पुष्ट्यर्थ. सर्वसामान्यपणें जी कथा जनमानसांत रुढ आहे ती सांगते की पार्वतीनें उटण्याची सजीव मूर्ती बनवून तिला द्वारपाल नेमून कोणासही आंत न सोडण्याची आज्ञा देऊन स्नानास गेल्यावर त्या गणानें प्रत्यक्ष शंकरासच मज्जाव केल्याने त्यांनी

त्याचा मस्तकछेद केला व हें वृत्त कळल्यावर पार्वतीनें आकांत मांडून त्रिभुवन भस्म करण्याचा निर्धार व्यक्त केला, तेव्हा श्रीविष्णूंनी गजवदन सुदर्शनाने छेदून/छाटून आणून त्या धडास लावलें व शंकरानें तें शरीर जिवंत केलें म्हणून तो गजमुख झाला व शिवपुत्र असे त्यास म्हणू लागले. पण खरी की शिवपुराणात वेगळीच आहे. ''गजवदन लावूनही तो द्वारपाल जिवंत होईना म्हणून शंकर, विष्णू चिंतित झाले. सूर्यानें आत्मशक्ति प्रकट केली, चंद्रानें अमृत अर्पिले, मुनींनी अन्नप्राणादींची शक्ती दिली, शंकरांनी सर्व विद्या कला खर्ची घातल्या, सर्व मंत्रशास्त्र सोहळा केला, पण सर्व व्यर्थ. तेव्हा देवांनी दीनवाणे होऊन ब्रह्माचे स्तवन केले. तेव्हा अकस्मात् आकाशवाणी झाली ''ॐकारास आवाहन करा''. त्याप्रमाणे ॐकाराचे आवाहन करताच तो बाळ जिवंत झाला.'' ही मूळ कथा आहे. रजोरुपी ब्रह्मा, सात्त्विक व रमारमण विष्णू आणि उग्र तमरुपी शंकर. पंचम नावाचें जें शुद्ध तत्त्व आहे तेंच विनायकाचें स्वरुप असें ब्रह्मवैवर्त पुराण सांगतें. स्मृतीचें वचन स्पष्ट आहे. ''जेथे ॐकार आकृती धारणा तोच गजानन जाणा.'' वेदांची माता गायत्री, त्यांचा पिता प्रणव तोच हा 'तत्त्वमसि' सगुणरुपी साकार गजानन. ऋषींच्याहि मतें सर्वांत मुख्य व श्रेष्ठ ॐ कार त्याहून / त्याचेपेक्षा अन्य कोणी मोठे नाही. तोच हा श्रीगणेश सर्वश्रेष्ठ. त्यामुळें या अग्रपूजिताची उपासना प्रार्थना केल्यानंतरच आणि तीहि श्रद्धा भक्तीनें, तरच कोणतीहि गोष्ट/ कार्य सिद्ध होते अन्यथा नाही. इतर कोणत्याहि दैवताची कामनासिद्ध्यर्थ केलेली उपासना गणेशपूजन केल्याशिवाय फळ देणार नाहीच हें लक्षांत ठेवावें.

अशा या श्रीगणेशाचा लोक ''स्वानंदलोक'' म्हणून ओळखला जातो. महालयामध्ये त्रिगुणामय शिवादि लोक पूर्ण लय पावले तरी ''स्वानंदलोक'' एकटाच उरतो. कारण त्याची देवता श्रीगणेश ॐकार रुपी अक्षय व सर्वकारक आहे. श्रीगणेशाचा नाममहिमा अपार आहे. त्याचें नामांत सविकार व निर्विकार गणांचे अधिष्ठान व स्वामित्व आहे. तो पाता व पालयिता ब्रह्मणस्पति आहे. या नामांत बुद्धि स्थिर व निश्चल होते. त्याचा महिमा असीम आहे. कारण श्रीगणेश ॐकाररुपी असीम आहे. संन्यास घेतल्यावर गायत्री मंत्र त्यागला जातो. पण ॐकार जपच चालूं ठेवतात कारण त्याने स्वानंदलोकाचा अनुभव येतो म्हणून ॐकार जप सर्वांत आद्य व त्याची देवता श्रीगणेश आद्य व सर्वश्रेष्ठ. गायत्रींत परोक्ष सत्ता असली तरी अपरोक्ष सत्ता ॐकारांतच असते. त्यामुळेच मंत्रसिद्धी होते व त्याच्या या सामर्थ्यामुळेच प्रत्येक मंत्र ॐ नें सुरु होतो. श्रीगणेशपूजनाशिवाय कोणतीही देवता प्रसन्न होत नाही व ॐ कार लावल्याशिवाय कोणताही मंत्र व्यर्थ जातो. गणेशगीतेंत तर स्पष्ट सांगितलें आहे की गणेशनाम जर अंतःकाळी स्मरलें तर पुनर्जन्म नाही. जन्ममरणफेरा चुकविला जातो.

ब्रह्मा, विष्णू, महेश, सूर्य व शक्ती या पंचदेवता प्रमुख असून इतर देव देवता हे त्यांचेच अंशावतार आहेत. पण या पाच प्रमुख देवता श्रीगणेशापासूनच उत्पन्न झाल्या आहेत असे श्रीमद् गणेश गीतेत वचन आहे. प्रत्यक्ष श्रीगणेशांनीच त्यांचा शिष्य राजवरेण्य यास श्रीगणेशगीता श्रीक्षेत्र राजूर येथे प्रतिपादली त्यात ते सांगतात की, ''मत्त एव महाबाहो जाता विष्ण्वादय सुराः। मय्यैव च लयं यान्ति प्रलयेषु युगे युगे॥'' (अध्याय ३-७).

म्हणजे विष्णू आदि युगायुगांतील देव मजपासूनच उत्पन्न होतात व होणाऱ्या प्रलयांत ते माझ्यांतच लय पावतात. पुढे अध्याय ९-१९ मध्ये ''इन्द्राद्या लोकपालश्च मनैवांऽश समुद्भवाः॥'' म्हणजे इन्द्रादि लोकपालहि माझीच उत्पत्ति आहे. माझ्याच अंशापासून ते निर्माण झाले आहेत.

''मत्तो ऽ ग्निरापो धरणी मत्त आकाश मारुती।
ब्रह्मा विष्णुश्च रुद्रश्च लोकपाल दिशो दश''
म्हणजे पृथ्वी, आप, तेज, वायु, आकाश हीं पंचमहाभूतें व ब्रह्मा, विष्णू, महेश, अष्ट-लोकपाल व दश-दिशा माझ्याचपासून उत्पन्न झाल्या आहेत.

''मयुरायानाथः त्वमासिच मयूरेश भगवान्।
अतत्सां संध्यायै शिव हरिरवि ब्रह्म जनकम्॥''

म्हणजे शिव, विष्णू व ब्रह्मदेव यांचा जनक मयूरेश हाच आहे. ब्रह्मपुराणांत विष्णू शिवास सांगतात की तूं मी जरी स्वयंभू असलो तरी आपण दोघेही श्रीगणेशापासून उत्पन्न झालो आहोत, म्हणून त्याचे पुत्र आहोत. तो श्लोक असा :-

''अहे त्वं च स्वयंभूश्च हिरण्य पुरुष शिवा गणनाशात्समुत्पन्ना गणेशतनया वराः।''

गणेश आद्य आहेत. ब्रह्मा विष्णू महेश त्यांचे पूजन करतात. तेच सृष्टीचा हेतू व सर्व कारणांचे कारण आहेत. त्याचेच योजनेप्रमाणे व आज्ञेने ब्रह्मदेव सृष्टी निर्माण करतो, विष्णू पालन करतो व शंकर संहार करतो व सूर्य गगनात संचार करतो. म्हणजेच सर्वकारक श्रीगणेशच आहेत. इतर देवदेवतांची उपासना करुन भक्त त्या त्या लोकी गेले तरी त्यांना परत यावे लागते कारण ते लोक मोक्षस्थान नव्हेत पण गणेशभक्तंना जो गणपतीचा ''स्वानंद लोक'' मिळतो, तो मोक्षलोक त्यापासून ते परत येत नाहीत. श्रीमद् गणेशगीतेत अध्याय ६-१९ मध्ये यासंबंधी खालील श्लोक आहे.

''ब्रह्माविष्णुमहेन्द्रार्धोल्लोकात्प्राप्त पुनः पतेत।
यो मामुपैत्यसद्विग्धं पतनं तस्य क्वचित॥''

वरील सर्व विवेचनावरुन हे स्पष्ट होते की श्रीगणेश स्वयंभू आदिअंत नसलेले मूळ दैवत आहे. तेच अक्षय अविनाशी ॐकार रुप आहे. तेच सर्व जगाचे, देवांचे, ज्ञानांचे व इतर सर्व गोष्टींचे कारक आहेत, पालक आहेत, तारक आहेत व लयकर्ते आहेत. या सर्वांना प्रारंभ गणेशापासून व लय गणेशातच होतो म्हणूनच श्रीगणेश हे स्वयंभू सर्वश्रेष्ठ आहेत.

श्रीगणेश उपासना सर्वश्रेष्ठ कां? याचें कारण गणेश हेंच सर्वश्रेष्ठ आहेत. त्यामुळे त्यांची उपासना ही सर्वश्रेष्ठाची उपासना आहे म्हणूनच ती सर्वश्रेष्ठ आहे. सर्वश्रेष्ठत्व उपासनेस तेव्हाच मिळतें जेंव्हा तिची देवता सर्वश्रेष्ठ असते म्हणूनच या लेखांत श्रीगणेशाचें सर्वश्रेष्ठत्व प्रतिपादन केलें आहे-

निगुर्ण, निराकार, सगुण साकार. सर्व जगनिर्माता, सर्व देवनिर्माता, सर्व शास्त्रांचा निर्माता, सर्वजगचालक, सर्वजगलयकर्ता, सर्वापेक्षा वेगळा व श्रेष्ठतम असा देव म्हणजेच गणेश. वेदांनाही अगोचर महायोग्यांनाही थांग न लागणारा, स्वयंभू ॐकार प्रणवरुप श्रीगणेशच मूलकारक म्हणूनच श्रेष्ठतम. त्याहून कोणी मोठे, शक्ति ज्ञान याचे कारक नाहीतच. आदिबीज म्हणजे श्रीगणेश.

श्रीगणेश-उपासना करण्याचे विविध प्रकार आहेत. नामस्मरण ही सुद्धा पूजाच आहे. नवविधा भक्तीप्रकारांतील हा सर्वात सोपा, कसलेहि बंधन नसलेला, कोणासहि करता येणारा सोपा मार्ग आहे. त्याशिवाय षोडसोपचार पूजा, यंत्र-पूजा इ.इ. अनेक प्रकार आहेत. जसें ज्याला जमेल तो प्रकार त्यानें अवलंबावा. यज्ञ, योग, सत्यविनायक पूजा, व्रत, वैकल्ये, मंत्रजप इ.इ.

उपासना ही अशी गोष्ट आहे की जी मानवास ऐहिक, पारमार्थिक, लौकीक, बौद्धिक, शारीरिक, आंतरिक सुख व आनंद देते. ही दिवस-रात्रीतील संकटांना मुक्त करण्याची दिव्य किल्ली आहे व ती जसजशी वृद्धिंगत होईल तसतसें परमेश्वर सान्निध्य अनुभवता येईल.

''आदरेण यथा स्तौति धनवन्तं धनेच्छया।
तथा स्तुवीत विघ्नेशं सर्वन्कामान् अवाप्नुयात्॥''

ज्याप्रमाणें द्रव्य-लाभ इच्छेनें धनवानाची माणूस स्तुति करतो, त्याचप्रमाणें जो विघ्नेशाची स्तुति करील त्याचे मनोरथ श्रीगणेश निर्विघ्नपणे पूर्ण करतो.

तेव्हा सर्वश्रेष्ठ गणेशाच्या उपासनेस सर्वश्रेष्ठत्व आहे हें जाणून घ्या व त्या ॐकार रुप गणेशाची उपासना करुन सर्वश्रेष्ठ गणेशाच्या स्वानंदलोकीं जाऊन जन्ममरण फेऱ्यातून मुक्ती मिळवा हीच अपेक्षा व विनंती करुन लेखणीला विराम देतो.
- हा लेख श्रीगणेशचरणीं समर्पण. इत्यलम्।

**वसंत गोडबोले**
फ्लॅट नं.५, दीपाली अपार्टमेंटस्,
१२४, शनिवार पेठ (नेनेघाट), पुणे - ४११०३०
भ्रमणध्वनी : ९४२३८५८८२३

(पृष्ठ क्र. ५ वरून...**श्रीमच्छंकराचार्यविरचितं द्वादशज्योतिर्लिङ्गस्तोत्रम्।...**)

'इउउइ' हा प्रकार प्रस्तुत श्लोकांत आहे. इन्द्रवज्रा व उपेन्द्रवज्रा ह्या दोन वृत्तांच्या मिश्रणानें हें वृत्त होते. प्रत्येक पदांत ११ अक्षरें असतात व यति ५ व्या अक्षरावर व पादान्ती असते.

(क्रमशः)

**- दि. दा. औटी**

●●●

**(पृष्ठ क्र. १६ वरून...** **उतार वयातील एकटेपण सुसह्य कसे होईल ?...)**

आपल्या मनाचा कौल घेऊन मगच काय ते ठरवणे. निवृत्ती नंतर आर्थिक विवंचना नसेल तर विनाअपेक्षा आपणास आवडणाऱ्या क्षेत्रांत समाजकार्य/कार्य केल्यास एकलेपणा वर फक्त मात करता येईल, पण मानसिक शांती, समाधान, व निखळ आनंदही मिळेल नाहीतर तुझे आहे तुज पाशी परी तू जागा चुकलासी अशी आपली गत होईल. सकारात्मक, विचार, आचार कायमच जोडण्याचा प्रयत्न, आपले राखावे व दुसऱ्याला यश द्यावे ही भावना व विचारसरणी ठेवणे. यामुळे ऐकलेपणाची कमीतकमी जाणीव होण्यास मदत होईल.

नाही तरी श्रीमत् आदिशंकराचार्यांनी लिहून ठेवले आहे की,

बालस्तावत्क्रीडासक्तः
तरुणस्तावत्तरुणीसक्तः।
वृद्धस्तावच्चिन्तासक्तः
परमे ब्रह्मणि कोऽपि न सक्तः॥

**श्री. प्रकाश दीक्षित**
भ्रमणध्वनी :९८१९६९३१९५

# कौटिल्यीय अर्थशास्त्र - 'राष्ट्र संकल्पना'

डॉ. वैशाली दाबके

(लेखांक २)

मागील लेखांत 'राष्ट्र' ही संकल्पना आणि राष्ट्रसंकल्पनेचा उदय आणि इतिहास आपण थोडक्यांत पाहिला. अर्थशास्त्रांतील याच मध्यवर्ती संकल्पनेचा विचार, या लेखांत विस्तारानें केला आहे. अर्थशास्त्रांत कौटिल्य म्हणतो की 'सहायसाध्यं राजत्वं चक्रमेकं न विद्यते।' रथ ज्याप्रमाणें एका चाकाच्या आधारें चालूं शकत नाही त्याप्रमाणे राजत्व अथवा राजेपण एकट्या व्यक्तीला निभावून नेणें शक्य नाही. त्याची सफलता इतर अनेक घटकांवर आधारित असते. परिपूर्ण राज्य अस्तित्वात येण्यासाठीं कांहीं मूलभूत घटकांची आवश्यकता असते ज्यांना 'प्रकृति' हें सामान्य नांव आहे.

'प्रकृति' शब्दाचा कोशांतील अर्थ 'स्वभाव', 'मूळ स्वरुप', 'मूळ स्वभाव',असा दिलेला आहे. स्वरुपाशिवाय वस्तू अस्तित्वांत येऊ शकत नाही. राज्याचीं अंगेंहि तशीच अनिवार्य आहेत. त्यांतील एक अंग जरी नसेल तरी राष्ट्र पूर्णत्वास जाणार नाही म्हणूनच त्यांना 'प्रकृति' म्हटलें आहें. 'प्रकृति' ह्या संज्ञेचा दुसरा अर्थ मंत्री अथवा प्रजा असाहि होतो. प्रजा आणि मंत्री हीं राज्याच्या सात अंगांपैकीं आहेत. बहुतांशी शास्त्रकार आणि कौटिल्यानें सांगितलेलीं राज्याचीं सात अंगे पुढीलप्रमाणें - १) स्वामी - राजा. २) अमात्य. ३) जनपद - राज्यातील भूप्रदेश आणि त्यावर रहाणारे लोक. ४) दुर्ग. ५) कोश (खनिज). ६) दंड-सैन्य. ७) मित्र.

राज्याच्या अंगांचा विचार कौटिल्यपूर्व काळांतहि झालेला दिसतो. गौतम धर्मसूत्रें आणि आपस्तंब धर्मसूत्रें या प्राचीन सूत्रग्रंथांतहि स्वामी भूप्रदेश, प्रज्ञा आणि राज्यकारभाराची व्यवस्था या चार अंगांचा निर्देश आढळतो. (काळ इ. स. पू.६०० ते ३००) तर महाभारतांतील आश्रमवासी पर्वांत राज्याच्या आठ अंगांचा उल्लेख येतो. राज्याच्या अंगांच्या संख्येत मतभेद असले तरी राज्यघटकांशिवाय राष्ट्र उभें राहूं शकत नाही. ह्याविषयीं सर्व विचारवंतात एकमत दिसतें.

या सात अंगांचा क्रमहि तितकाच महत्त्वाचा आहे. या सात अंगामधील पूर्व पूर्व अंग हे उत्तरोत्तर अंगापेक्षा अधिक महत्त्वाचें असतें.

या अंगांची नावें आणि क्रम याविषयीं विविध मतें आढळतात. जनपदाच्या ऐवजी कुणी 'जन' किंवा 'राष्ट्र' हा शब्द योजतात. कुणी 'दण्ड' ऐवजी 'बल' तर कुणी 'दुर्ग' ऐवजी 'पुर' असे म्हणतात. या अंगांच्या क्रमाच्या बाबतीतहि मतभिन्नता असली तरी राजा हे अंग सर्वांत अधिक महत्त्वाचें आहे हें मात्र सर्व ग्रंथकार मानतात ही सर्व अंगें एकमेकांना पूरक आणि एकमेकांवर अवलंबून असतात. या सात अंगांपैकीं एक जरी शक्तिहीन झालें तरी इतरांवर त्याचा परिणाम होतो. तसेच एखाद्या प्रसंगीं एखाद्या विशिष्ट अंगाला महत्त्व प्राप्त होतें, जें तत्कालिक असतें. राजाचें स्थान मात्र कायम वरचें व सर्वांत महत्त्वाचें आहें असें कौटिल्य म्हणतो 'कूटस्थानीयो हि स्वामी' कौटिल्यानें या सात अंगांच्या उत्कृष्ट गुणांचे विवेचन केलें आहे.

(पृष्ठ २९ वर)

(जानेवारी २०१६ च्या अंकातील 'ईशावास्थमिंद सर्वं' या शीर्षकाच्या लेखाला जोडून वेदविद्येच्या तिसऱ्या महत्त्वाच्या सिद्धांतावर विवेचन आहे. - संपादक)

मृत्यू ही माणसाला भयचकित करणारी, अद्‌भूत वाटणारी, विचार करावयास लावणारी, अशी घटना असून सुद्धा मानवाला ती आजपर्यंत अगम्यच राहिली आहे.

गेल्या शतकांत भौतिक शास्त्रांची अचाट प्रगति होऊन मानव पृथ्वीच्या गुरुत्वाकर्षणाला उल्लंघून अंतराळांत भरारी मारत प्रत्यक्ष चंद्रावर पोहोचून सुद्धा 'मृत्यू' म्हणजे काय याची भौतिक शास्त्रांच्या आधारें उपपत्ति लावण्यास आजपर्यंत तरी असमर्थच ठरला आहे.

उच्च-नीच, राव-रंक, सर्व शक्तिमान् सम्राट-भिकारी या सर्वांना सारखेच लेखणारा, कुणाचीहि भीडमूर्वत न ठेवणारा किंबहुना सर्वांना समपातळीवर आणून सोडणारा असा सर्वांत समतावादाचा कहर म्हणून जर कोणी असेल तर तो एकमेव मृत्यूच होय.

वेदान्त तत्त्वज्ञानाप्रमाणे, आपल्या आयुष्यात केलेल्या बऱ्यावाईट कर्मांचीं फळें वा परिणाम भोगण्यासाठीं, स्वर्ग किंवा नरक इतकेंच काय तर मोक्षाचें द्वारापर्यंत पोहोचविण्याचें काम मृत्यूच करीत असतो.

कोणताही जीवित प्राणी मेल्यानंतर तो, त्याचा संपूर्ण जड देह जसा होता तसाच मोडून जातो. जिवन्तपणीं त्याच्या देहाला चेतना देणारी कोणती तरी अदृश्य शक्ति (वस्तू)च मृत्यूसमयीं त्याच्या शरीरांतून निघून जात असली पाहिजे, असेच अनुमान त्यामुळें माणसानें काढलें. मारणसमयीं शरीरांतून निघून जाणाऱ्या या वस्तूचें (वजन) वस्तुमान (mass) ठरविण्याचा प्रयत्न शास्त्रज्ञांनीं केला, परंतु मरणपूर्व व मरणोत्तर देहाच्या वजनात कोणताच फरक पडत नाही असें त्यांना आढळून आलें. यावरुन असें सिद्ध झालें की जीव किंवा आत्मा ही वस्तू केवळ अदृश्यच नाही तर तिला वस्तुमानही नाही आणि म्हणूनच वस्तुमान नसलेला हा पदार्थ (आत्मा) पदार्थ विज्ञान किंवा अन्य भौतिक शास्त्रांच्या कक्षेत येत नसावा; आणि त्यामुळेंच भविष्यांतहि कधीं काळीं भौतिक शास्त्रज्ञांना आत्म्याची उपपत्ति लावतां येईल असें वाटत नाही. आणि त्यामुळेंच आत्म्याविषयी ज्ञान मिळविण्यासाठी आपल्याला अध्यात्म शास्त्राकडेंच वळावें लागतें.

जगातील सर्व धर्मांमध्ये देहापासून निराळ्या अशा आत्म्याचें अस्तित्व मान्य केलें गेलें आहे. या जन्मांत आपण केलेल्या बऱ्या-वाईट गोष्टींचा जाब एकदिवस जगन्नाथासमोर (देवासमोर) द्यावा लागेल असेही प्रत्यक्ष व अप्रत्यक्षपणे सर्व धर्मांत गृहित धरलें गेलें आहे. व या मूळ सिद्धांताच्या अनुषंगानेंच नीतीचे नित्याचरणविषयक नियम सर्व धर्मांत सांगितले गेले आहेत.

मरणानंतर देह पंचतत्त्वांत विलीन झाल्यावर मागें कांहींच उरत नाही. आत्म्याचें सातत्य वगैरे गोष्टी निवळ थोतांड आहेत,

यावत् जीवं सुखं जीवेत् ऋणं कृत्वा घृतं पिबेत् ।
भस्मीभूतस्य देहस्य पुनरागमनं कुतः॥

ही चार्वाक नीति कोणत्याच धर्माला मान्य नसून कोणत्या ना कोणत्या स्वरुपांत आत्म्याचें सातत्य (प्रत्यक्ष वा अप्रत्यक्षपणें) सर्व धर्मांनी मान्य केलें आहे. त्याच सिद्धांताच्या पायावर धर्माच्या अनुयायांना विविक्षित आचार-नियम पालन करण्याचें बंधन सर्व धर्मांत घालण्यात आलें आहे.

कोणत्याहि स्थळ-काळाची माहिति, त्या स्थळ-काळाचा अनुभव घेऊन कोणी व्यक्ति परत येऊन आपणास सांगते, त्यावेळीच आपणास (तिकडे प्रत्यक्ष न जाता) प्राप्त होऊ शकते. जसे अंतराळात गेल्यावर पृथ्वी कशी दिसते, किंवा गुरुत्वाकर्षणाभावी काय विचित्र अनुभव येतो, वगैरे माहिती, अंतराळवीर अंतराळप्रवास करुन जेव्हा पृथ्वीवर परत येतो. तेव्हांच त्याच्याकडून आपणास मिळूं शकते. परंतु मरणोत्तर जीवनाची माहिती तो अनुभव घेतलेली मृत व्यक्ति भूतलावर कधीच परत येत नसल्यामुळें, मरणोत्तर जीवनाविषयी माहिती मिळविण्याचा उपरोक्त सोपा मार्ग आपणांस कधींच उपलब्ध होऊ शकत नाही.

आपल्या भारत वर्षांत प्राचीन काळापासून अनेक ऋषिमुनि होऊन गेले की ज्यांना अतींद्रिय दृष्टी देणाऱ्या सिद्धी प्राप्त झाल्या होत्या. त्यांतले काही त्रिकालज्ञानी होते. त्यांना एखादी व्यक्ती गेल्या जन्मांत कोण होती किंवा पुढल्या जन्मांत कोण असेल. हे समाधिमार्गे दिव्य दृष्टीनें दिसत असें. असे बरेच दाखले महापुराणांत रामायण-महाभारत आदी अध्यात्म-वाङ्मयांत आपल्याला वाचावयास मिळतात. अशा सर्व ऋषिमुनींनीं फार प्राचीन काळापासून पुनर्जन्माचा सिद्धांत सांगितला आहे व तोच वेदविद्येंत समाविष्ट आहे.

माणसाचा जड देह जरी नाशिवंत असला तरी त्याच्या अंतरांत वास करणारे परमात्म्याचें अंश रुप आत्मतत्त्व (आत्मा) अमर असतो. तो विशुद्ध आत्मा माणसाची मनोवृत्ति, अभूक्त कर्मफलें व अतृप्त वासना यांनीं वेढलेला असा जिवात्मा बनतो व त्याला व्यक्तित्व (Individual Identity) किंवा विवक्षित्व प्राप्त होतें. हा जिवात्मा सूक्ष्म इंद्रियांना व सूक्ष्म मन-बुद्धीला घेऊन सूक्ष्म देहांत बसत असतो. मरणसमयीं हा सूक्ष्मदेह जडदेहांतून बाहेर पडतो तेव्हा मृत जड देह मागे राहतो. पुढे जिवात्मा सूक्ष्म देहहि टाकून कारणदेहासह आपल्या कर्मानुसार व अतृप्त वासनांनुसार दुसऱ्या नव्या देहांत प्रवेश करतो. याप्रमाणे जन्ममृत्यूंच्या फेऱ्या करीत तो अनेक जन्म घेत राहतो. प्रत्येक जन्मांत (मानवाला) आत्म्याला आपली उन्नति करून घेण्याची संधी दिलेली असते. गतजन्मातील त्याच्या कर्तृत्वाप्रमाणें त्यानें केलेल्या साधनेप्रमाणे व त्याच्या अवशिष्ट अतृप्त वासनांप्रमाणें त्याला गतजन्मातील मृत्यूनंतर वर्तमान-जन्म प्राप्त होतो व वर्तमान जन्मांतील त्याच्या बऱ्यावाईट कर्मांप्रमाणें त्याला मृत्यूनंतर पुढील जन्म प्राप्त होतो. जन्मोजन्मीं आध्यात्मिक प्रगती करीत करीत एखाद्या महात्म्याला संपूर्ण आत्मज्ञान प्राप्त होऊन तो ब्रह्मलोकांत पोहोचतो म्हणजेच मोक्ष प्राप्त करतो व त्याच वेळीं जन्ममृत्यूंच्या फेऱ्यांतून तो मुक्त होतो असें या पुनर्जन्मसिद्धांताचें थोडक्यांत स्वरुप आहे.,

हें सर्व दृष्यं विश्व, एका अदृश्य, अक्षर, अव्यय, आणि सनातन अशा स्वयंभू ब्रह्म तत्त्वापासून निर्माण झालें असे वेद विद्या सांगते. या विश्वरचनेंत आपल्याला परमेश्वराच्या अत्युच्च सृजनकलेचा (Engineering) आणि व्यवस्थापन कसबाचा (Management skill) प्रत्यय येतो. जीवसृष्टी निर्माण करण्यापूर्वी जीवाला आवश्यक अशा प्राणवायू, जीवन (पाणी) आधार, प्रकाश, उब (उष्णता) वगैरे गोष्टी पुरविण्यासाठीं विश्वकर्म्यानें पंचमहाभूतांची योजना केली आहे. जीव-सृष्टीमध्यें एकमेकाला पूरक, वनस्पती व प्राणी-जात असे दोन विभाग निर्माण केले आहेत. अशी ही स्व-नियंत्रित (self-controlled) व निज-उपायकारक (Self Repairing) सृष्टीची प्रकृति-व्यवस्था म्हणजे अत्युत्तम नियोजन व्यवस्थेचें एक उदाहरणच आहे.

एखादा कारखाना उभारण्यासाठीं सुयोग्य स्थळ, वास्तू, यंत्रसामुग्री, कच्चा माल वगैरे गोष्टींचे नियोजन करावें लागतें, परंतु तो कारखाना चालविण्यासाठीं म्हणजे त्यातून प्रत्यक्ष उत्पादन करण्यासाठीं मात्र निरनिराळ्या कामगारांची, कारागीरांची व निरनिराळ्या स्तरांवर व्यवस्थापकांची गरज लागते. त्याच न्यायानें या विश्वाच्या कारखान्याची व्यवस्था बघण्यासाठीं ईश्वरानें मानवाची नेमणूक केली आहे. आणि त्यासाठी त्यानें मनुष्याला संवेदनशील मन व विचार करु शकणारी बुद्धि बहाल केली आहे. मनुष्य ही ईश्वराची सर्वात उत्तम कलाकृती आहे. 'Man is made in the image of God' असें बायबलमध्यें म्हटलें आहें. याचा अर्थ मनुष्य ही ईश्वराचीच प्रतिकृती वा प्रतिबिंब आहे. या प्रतिकृतीला (मानवाला) मूळ-आकृतीला (परमेश्वराला) ओळखण्याची विचारशक्तीहि त्यानें दिली आहे. पण ही विचारशक्ति सुप्त असून त्रिगुणांनीं आच्छादित आहे. तिला जागृत करण्यासाठीं खूप अभ्यास व साधना (तपस्या) करावी लागते. बुद्धीच्या अशा जागृतीलाच 'Self Realization' आत्मज्ञान होणें असे म्हणतात. अध्यात्मशास्त्रात त्याला नुसते 'ज्ञान' या संज्ञेनेहि ओळखलें जातें.

कारखान्याच्या व्यवस्थेमध्ये ज्याप्रमाणे माणसांच्या (कर्मचाऱ्यांच्या) शिक्षण व तांत्रिक कसबाप्रमाणे त्यांना निरनिराळी कामें दिलीं जातात. त्याचप्रमाणें या विश्वाच्या कारखान्यांत माणसाच्या कुवतीप्रमाणें माणसाला कामें करावीं लागतात. कारखान्यांत काम करणाऱ्या माणसानें आपलें काम व्यवस्थित व सचोटीनें केलें व तें करत असतांनाच आणखी ज्ञान किंवा कौशल्य संपादन केलें, तर त्याला ज्याप्रमाणें पदोन्नति मिळते त्याप्रमाणेंच या जन्मांत देश-कालाप्रमाणें आपल्यावर नेमलीं गेलेलीं कर्तव्यें सचोटीनें व कर्तव्यबुद्धीनें पार पाडत असताना माणसानें कोणत्याही विद्येंत वा कलेंत विशेष प्रगती केली तर पुढील जन्मीं त्याला पदोन्नति मिळते, म्हणजे तो अशा परिस्थितीत किंवा कुळांत जन्म घेतो की जेथें त्या विद्येंत वा कलेंत आणखी वरच्या दर्जाचें नैपुण्य वा प्राविण्य मिळविण्याची संधि त्याला मिळूं शकेल.

ज्याप्रमाणें शाळेमध्यें एका इयत्तेंत असलेल्या विद्यार्थ्यानें नेमून दिलेला अभ्यास उत्तम रीतीनें पार केला कीं त्या पुढील वर्षीं वरच्या

इयत्तेंत प्रवेश मिळतो व तसें न केल्यास खालच्या इयत्तेंतच बसावें लागते; त्याप्रमाणेंच या जन्मीं माणसानें आपलीं नियत कर्मे व कर्तव्यें उत्तम रीतनें पार पाडत असतानाच आपल्या ज्ञानांत व कौशल्यांत भर टाकली तर त्याला पुढील जन्मीं जास्त विकसित असें व्यक्तिमत्व प्राप्त होतें. या उलट या जन्मीं आपल्या वेळेचा व बुद्धीचा अपव्यय करुन आपल्या दुष्कृत्यांनी परमेश्वराच्या शासन-व्यवस्थेंत खीळ घालण्याचा प्रयत्न केल्यास (म्हणजेच दानवी वृत्तीने दैवी प्रकृतीच्या नियमांचे उल्लंघन केल्यास) त्याला अधोगति प्राप्त होते.

भारतीय सनातन धर्मांत हजारों वर्षांपूर्वीपासून हा पुनर्जन्माचा सिद्धांत (Theory) मान्य केला गेला असून त्याच्या आधारानेच (अनुषंगानें) अध्यात्म-विद्या विकसित केली गेली आहे. दुसऱ्या कोणत्याहि धर्मांत पुनर्जन्माची कल्पना मान्य केलेली नाही. माणसाला आपल्या आयुष्यांत केलेल्या बऱ्यावाईट गोष्टींचा जाब मेल्यानंतर ईश्वरापुढें द्यावा लागतो व त्याच्या कर्मानुसार त्याला स्वर्ग किंवा नरकाची प्राप्ती होते वगैरे कल्पना सर्व धर्मांत थोड्या फार फरकानें निरनिराळ्या स्वरुपांत रुढ असल्या, तरी पुनर्जन्म व जन्ममृत्यूच्या चक्रांतून आत्म्याचा विकास व उन्नती व शेवटी अंतिम आत्मज्ञानानें त्याला होणारी ब्रह्मप्राप्ति व जन्ममरणाच्या फेऱ्यांतून सुटका (मोक्ष) वगैरे कल्पनांचा त्यांच्या धर्मांत समावेश नाही. परंतु या सिद्धांताच्या अभावीं या परमेश्वराच्या राज्यांत दिसणाऱ्या विसंगति व तशाच बऱ्याच गूढ प्रश्नांचें सोपपत्तिक उत्तर त्यांच्या धर्मशास्त्रांत मिळू शकत नाही. इतर धर्मांतील बरेच विचारवंत व तत्त्ववेत्ते याच कारणासाठीं पुनर्जन्माच्या सिद्धांताचा हवाला घेतात. परंतु अधिकृतपणे या सिद्धांताला त्यांच्या धर्मशास्त्रांत मान्यता नाही.

पुनर्जन्माचा हा सिद्धांत केवळ तो आमच्या (तथाकथित) त्रिकालज्ञानी ऋषींनी हजारों वर्षांपूर्वीपासून सांगितला आणि त्यास हजारो वर्षांच्या काळात कोणीही पर्याय सुचविलेला नाही (किंवा त्याला खोडून काढला नाही.) केवळ म्हणूनच तो ग्राह्य धरावा असे नसून हा सिद्धांत शास्त्रीय दृष्टिकोनांतून विचार केल्यास व त्यास कार्यकारणभावाच्या व तर्कशास्त्राच्या कसोट्या लावल्यासहि अनुमानाने सिद्ध होतो, इतकेंच नव्हें तर या विश्वव्यवस्थेतील कित्येक विरोधाभास व गूढ कोड्यांचीं समाधानकारक उत्तरें या सिद्धांताच्या आधारें कशीं सापडतात तें खालील विवेचनांत दिलेल्या कारणांवरुन दिसून येईल.

१) कार्यकारण भाव हा शास्त्रीय विश्लेषणाचा पाया आहे. कोणत्या हि घटनेला कांही तरी कारण असतें, म्हणजे कोणतीहि घटना कुठल्या तरीं कारणाचा परिणाम असते. कोणतीहि घटना कारणाशिवाय आपोआप घडू शकत नाही. या तत्त्वाच्या आधारानेंच कट्टर वैज्ञानिक दृष्टीचे लोक दैव किंवा नशीब मानत नाहीत. आतां या विचारधारेची कसोटी, आपण 'एक मूल राजघराण्यांत जन्माला येतें, - त्याचवेळीं दुसरें मूल झोपडपट्टींत जन्मास येते' - या दोन घटनांना लावण्याचा प्रयत्न करुं. आयुष्य सुरु होण्यापूर्वीच या दोन मुलांना इतक्या भिन्न अवस्था का प्राप्त व्हाव्या? या जन्मांत कोणतीहि बरीं वाईट कर्मे करण्याची संधि मिळण्यापूर्वीच त्यांचा जन्म झाला

आहे. त्यामुळें या दोन अगदी भिन्न फळांना दोन भिन्न कारणें असतील तर तीं शोधण्यासाठीं आपल्याला त्यांच्या गत जन्मांतील कर्मांकडेंच पहावें लागेल. त्यामुळें या ठळक विरोधाभासाचें उत्तर आपल्याला कार्य-कारण-भावाच्या अभियांत्रिकेने (by Cause and Eeffect Mechanics) द्यावयाचे असेल तर आपल्याला त्यांचा संबंध गत-जन्मातील कर्मांशीच जोडावा लागेल, म्हणजे अप्रत्यक्षपणें आपल्याला पुनर्जन्म-सिद्धांताचाच आधार घ्यावा लागतो.

२) वर दाखविलेला विरोधाभास हा दोन, निरनिराळ्या परिस्थितींत जन्मलेल्या मुलांच्या बाबतीतचा होता. पण त्याहीपेक्षा मोठा विरोधाभास आपणास एकाच परिस्थितींत जन्मलेल्या मुलांच्या भिन्न गुणवत्तेत दिसतो. एकाच सामाजिक व आर्थिक परिस्थितींत किंबहुना एकाच घरांत जन्माला आलेलें एक मूल अतिशय बुद्धिमान तर दुसरें अगदी मंद बुद्धीचें निपजूं शकतें. ह्याला शास्त्रज्ञ अनुवंशिकतेचे कारण सांगतील! पण एकाच आईबापांच्या दोन मुलांतहि अशी भिन्नता असूं शकते. कधीं कधीं त्या मुलांची बौद्धिक पातळीसारखी असली तरी त्यांच्या प्रवृत्तींत दोन ध्रुवाचा फरक असू शकतो. एक मूल संत-प्रवृत्तीचें, दुसरें राजस प्रवृत्तीचें तर तिसरें दुष्ट प्रवृत्तीचें आहे, असें पाहाण्यात आलें तर या विरोधाभासाचें कारण दाखविण्यास आपल्याला त्यांच्या पूर्वजन्मींच्या इतिहासाचा आधार घ्यावा लागतो.

३) आपण क्वचित पाहातो की कांही व्यक्ति अतिमानवी बुद्धि व प्रतिभा घेऊन जन्माला येतात. आद्य श्रीशंकराचार्यांनी वयाच्या सहाव्या वर्षीच संन्यास घेतला. संबंध आयुष्य खर्च करून तीव्र बुद्धीच्या माणसालाही जे ज्ञान, जी परिपक्वता प्राप्त होणार नाही तेवढे ज्ञान व अभ्यास श्री शंकराचार्यांचा वयाच्या सहाव्या वर्षीच झाला होता. ज्या वयांत साधारण माणसाचा मूळाक्षरांचा अभ्यास सुरु होतो, त्या वयांत एवढें ज्ञान असण्याचा चमत्कार, त्यांनी या ज्ञानाची शिदोरी जन्मतःच आपल्याबरोबर आणली असल्याशिवाय होऊंच शकणार नाही. जन्मतः अशी शिदोरी मनुष्य पूर्वजन्मांतूनच आणू शकतो आणि पुनर्जन्म सिद्धांताशिवाय पूर्वजन्माची कल्पनासुद्धा करता येत नाही. म्हणून अशा चमत्कारांचे कारण शोधण्यासाठीं आपल्याला पुनर्जन्मसिद्धांताचाच आधार घ्यावा लागतो.

४) संत ज्ञानेश्वरांनी सोळाव्या वर्षी ज्ञानेश्वरीसारखा ग्रंथ लिहिला. त्यांचे पहिले १५ वर्षांचे आयुष्य कसे हाल-अपेष्टांत गेले व त्यांना शिकविण्यास त्यावेळच्या पंडित मंडळींनी कसा नकार दिला होता हें लक्षात घेतलें तर त्यांनी एवढें ज्ञान (संस्कृतचें आणि वेदान्त तत्त्वज्ञानाचे) केव्हां व कसें संपादन केलें असेल हा प्रश्न अनुत्तरितच राहातो. १५ वर्षाच्या आयुष्यात त्यांना नव्हती उसंत की साधनें ! त्यांचे गुरु श्री निवृत्तिनाथ यांचीहि गत तशीच होती. त्यांनीहि ज्ञानेश्वरासारख्या शिष्याला देण्यासारखें ज्ञान प्रथम कोठें केव्हां व कसें मिळविलें असेल व त्यांनीं तें ज्ञानेश्वरांना केव्हां व किती वेळांत दिलें असेल याची कल्पनाच करवत नाही. यावरुन अशी थोर माणसें पूर्वजन्मांत मिळविलेल्या ज्ञानाची शिदोरी घेऊनच समाजबोधनासाठीं ईश्वरी संकेतानुसार पुनर्जन्म घेतात, असेंच मानावे लागते.

५) आपण पाहातो की, अगदी क्वचित् पण केव्हां तरी अशा विलक्षण व्यक्ति (Prodigies) जन्माला येतात की, त्यांना लहान वयांतच कांहीं अद्‌भुत सिद्धि प्राप्त झालेल्या असतात व ज्यासाठीं त्यांनीं वर्तमान आयुष्यांत कुठलाहि अभ्यास वा प्रयत्न केलेले नसतात. रामानुजम्, शकुंतलादेवी ही उदाहरणें सर्व ज्ञात आहेत. रामानुजम्‌ने मृत्येपूर्वी लिहून ठेवलेल्या काही शुद्ध-आकड्यांच्या समीकरणांची उपपत्ती आजही अंकशास्त्रज्ञांना (काम्प्युटरच्या सहाय्यानेहि) लावता आलेली नाही. शकुंतलादेवी अगदी लहान वयात अंकगणितातील (७/८ आकडी संख्यांचे गुणाकार वगैरे) किचकट प्रश्नांची उत्तरे केवळ अंतःस्फूर्तीनि काही सेकंदांतच देत असे. अशा अद्‌भुत चमत्कारांची कारण मीमांसा केल्यास, त्यांस या जन्मांत घडलेलें कोणतेहि कारण मिळत नसल्यानें; गतजन्मांतील बरोबर आणलेली शिदोरी हेच कारण असावें, असाच निष्कर्ष काढावा लागतो.

६) आपल्याला क्वचित् प्रसंगीं असा अनुभव येतो कीं आपल्या जवळच्या नात्यांतल्या किंवा आपला ज्यांच्याशी खूप घनिष्ट सहवास घडला आहे अशा व्यक्तींशीहि आपला जेवढा सूर जुळत नाही तेवढा सूर पूर्वी कधीहि न भेटलेल्या व्यक्तीशी अगदी पहिल्या भेटींतच जुळतो. इतकचे नव्हे तर अशा माणसास आपण फार पूर्वीपासून ओळखत असावेत असा भासही आपणांस होतो. त्या व्यक्तीलाहि आपल्याबद्दल तशीच जवळीक वाटते. अशा चमत्काराला गतजन्मातील ऋणानुबंध असेंच कारण द्यावें लागेल.

७) सर्व साधारणपणें मनुष्याला त्याच्या शारीरिक व बौद्धिक योग्यतेप्रमाणें व त्याच्या प्रयत्न व कर्तृत्वाप्रमाणें त्याच्या कर्माला फळ (यश) मिळत असतें. चांगला अभ्यास केल्यास चांगले गुण मिळतात. चांगली विद्या हस्तगत केली, सचोटीने व्यापार केला तर चांगलें धन प्राप्त होतें. आपण लोकांना मदत केली तर लोकहि आपल्याला मदत करतात. हा सर्वसामान्य नियम झाला. पण व्यवहारात आपण यास अनेक अपवाद पाहातो. खूप विद्वान मनुष्य निर्धन राहातो, सचोटीनें व प्रामाणिकपणें व्यापार (व्यवहार) करणाऱ्यास हवा तसा फायदा होत नाही तर क्वचित प्रसंगी दिवाळें काढण्याची वेळ येते. दैव बलवत्तर असेल तर थोड्याशा प्रयत्नांनीसुद्धा घवघवीत यश मिळतें, तर उलट दैव प्रतिकूल असेल तर प्रयत्नांची पराकाष्टा करुनही यश दूरच राहतें. हा विरोधाभास आपण दैव किंवा नशीब यांचा आश्रय घेऊन सोडवितो.

विश्वनियंत्याला म्हणजेच परमेश्वराला सर्वच धर्मांत कृपाळू व न्यायी मानले जाते. परंतु वर सांगितलेल्या नशीबाच्या खेळामुळे ईश्वरास न्यायी मानण्यांत मोठीच बाधा येते. केवळ नशीब खोटं म्हणून प्रामाणिक प्रयत्न करणाऱ्या सज्जन माणसास यश मिळत नसेल, तर ईश्वराच्या राज्यातील हा मोठा अन्यायच म्हणावा लागेल. न्यायी परमेश्वराच्या राज्यांत असा अन्याय कसा असू शकेल? या प्रश्नातील कोंडी आपणास सोडवावयाची असेल तर दैव व नशीब अशी कोणतीही गोष्ट नसून, गतजन्मांतील कर्मांची अनभूक्त (म्हणजे भोगण्याची बाकी राहिलेली) फलेहि मनुष्यास या जन्मांतील कर्मफळांबरोबर

भोगावीं लागतात असें मानावे लागतें. गत व वर्तमान या दोन्ही जन्मांतील कर्मफळांची बेरीज वा वजाबाकी होऊनच शेवटीं निव्वळ फल माणसाच्या हातीं लागत असल्यामुळें तें नेहमीच वर्तमान कर्मानुसार असेल असें होत नाही आणि म्हणूनच वरील विरोधाभास निर्माण होतो.

• यारीतीनें, सकृत्-दर्शनीं, परमेश्वराला अन्यायी ठरविणाऱ्या विरोधाभासाची उकलही पुर्जन्माच्या सिद्धांतानेच होऊ शकते. दैव (अनुकूल वा प्रतिकूल) हे परमेश्वर निर्मित नसून ते आपल्याच गतजन्मींच्या अनभूक्त कर्मफलांचा या जन्मी भोगण्यासाठी आलेला परिपाक होय आणि त्यालाच प्रारब्ध अशी संज्ञा आहे. म्हणून परमेश्वर अन्यायी नसून तो न्यायनिष्ठूर आहे असेच अनुमान निघतें.
(• या विषयावरील विस्तृत विवेचन पुढच्या 'कर्माचा सिद्धांत' या प्रकरणांत पहावें.)

८) वरील सर्व कारणामुळे, पुनर्जन्माच्या सिद्धांतास केवळ अनुमानानेंच पुष्टी मिळते. परंतु प्रत्यक्ष पुरावा म्हणून मानता येतील. अशा काही माणसांना गतजन्मातील स्मृति असल्याच्या घटनाहि क्वचित् घडताना आढळतात.

साधारणपणे मनुष्याला गतजन्मीची कोणतीहि आठवण राहत नाही. परंतु क्वचित् अशी काही अपवादात्मक उदाहरणें घडतात कीं जेथें लहानपणी कांही मुलांना गतजन्मीच्या गोष्टी आठवत असतात. अशी बरीच उदहाहरणें पाश्चात्य देशांतहि घडली आहेत आणि पाश्चात्याच्या वैज्ञानिक दृष्टिकोनामुळें तेथें घडलेल्या अशा घटनांची तपशीलवार माहिती लिहिली गेली असून पुष्कळ पुस्तकांतून त्यांचें अवतरण केलें गेले आहे. स्वातंत्र्यवीर सावरकरांचे ज्येष्ठ बंधू बाबाराव सावरकरांनी त्यांच्या 'धर्म हवा कशाला' या पुस्तकांत अशा कित्येक उदाहरणांची तपशीलवार माहिती दिली आहे.

फ्रान्समध्यें एका मध्यम कुटुंबांत जन्मलेली एक मुलगी आपल्या मातृभाषेतील म्हणजे फ्रेंच भाषेतील शब्द शिकताना त्या शब्दाला जर्मन भाषेंतील प्रतिशब्द सांगत असे. त्यामुळे सर्वांना मोठेंच आश्चर्य वाटत असें. पुढें थोडी मोठी झाल्यावर ती आपल्या पूर्वजन्मींच्या जर्मन कुटुंबाविषयीं माहिती सांगू लागली. आपल्या जर्मनीतील गावांचें नांव, आपलें नांव, तेथील कुटुंबिय. तेथील घर, घराभोवतालचा परिसर यांचें वर्णन ती करावयाची. तिच्या पाळलेल्या कुत्र्याचें व मांजरीचें वर्णनहि तिनें केलें. तिच्या आईनें तिला दिलेली अंगठी तिनें कोठें ठेवली होती वगैरे बारीक सारीक तपशील ती आठवून सांगत असे. तिच्या फ्रेंच वडिलांना त्याबद्दल खूप कुतुहल होतें. त्यामुळे संधि मिळताच ते तिला घेऊन जर्मनीतल्या तिच्या गांवीं घेऊन गेले. तिथें रेल्वे स्टेशनवर उतरल्यावर तिनें बिनचूक त्यांना आपल्या पूर्वजन्मीच्या घरीं नेलें. तिथें तिनें सांगितलेल्या नावाचेंच कुटुंब राहात होतें. तेथें चौकशी करतां त्यांची (त्या नांवाची) मुलगी या मुलीच्या जन्मापूर्वी (काही महिने) वारली होती असें सिद्ध झालें. तिनें सांगितलेल्या रंगाचा व नावाचा कुत्राही त्यांच्याकडे होता व तिचा तो फार लाडका होता, असेही त्यांनी सांगितलें. ती मुलगी त्या घरांत गेल्यावर एकदम जणूं आपल्याच घरांत वावरत आहोत अशी वागू लागली. ती

आपल्या पूर्वजन्माच्या आईला प्रेमानें भेटली. तिनें (पूर्वी) घराचें केलेलें वर्णन त्या घराशी तंतोतंत जुळत होतें. आईनें दिलेली अंगठी ती कपाटात कोठें ठेवत असे, ती जागाहि तिनें बरोबर दाखविली.

पुढे काही वर्षांनी त्या मुलीची गतजन्मीची स्मृति कमी कमी होत पूर्णपणे नाहीशी झाली. पुढे जर्मन भाषेतील एकही शब्द तिच्या स्मृतींत राहिला नाही.

कांही वर्षापूर्वी झी टीव्हीवर बातम्यांमध्यें बिहारमधील एका गावांत झालेली पूर्वजन्मस्मृतीची अशीच एक घटना दाखविली होती. एका ४०/४५ वर्षाच्या बाईचा नवरा निवर्तल्या नंतर त्यांच्याच गावातील एका कुटुंबात एक मुलगा जन्मला. तो ७/८ वर्षाचा झाल्यावर त्याची गतजन्मीची आठवण जागृत झाली व तो गावातल्या या विधवाबाईचा नवरा होता असें सांगू लागला. त्यानें त्या बाईच्या आवडी-निवडी तिच्या नवऱ्यानें तिला दिलेल्या साड्या, दागिनें वगेरे सर्व गोष्टींचे तपशील बरोबर सांगितले. त्या बाईकडे हा मुलगा नेहमी जातो व त्यांच्या सहवासांत राहण्याचा प्रयत्न करतो. त्यानें सांगितलेल्या गोष्टी तंतोतंत बरोबर पटल्यामुळें त्या बाईंचाही हा आपलाच पति पुन्हां जन्माला आला आहे असा विश्वास बसला आहे, असेंहि टी.व्ही.वर सांगितलें आहे.

अशा घटना पुनर्जन्माचा सिद्धांत प्रत्यक्ष पुराव्यानेच सिद्ध करतात, यांत शंका नाही.

दररोजच्या व्यवहारात घडणाऱ्या घटनांना कार्यकारण भाव व तर्कशास्त्राच्या कसोट्या लावून अनुमानांनी पुनर्जन्म कसा सिद्ध होतो हें आपण या भागांत पाहिलें. आता सर्व उपनिषदांचें सार अशा भगवन्ताच्या मुखातून निघालेल्या गीतेसारख्या आधिकारी ग्रंथांत या विषयावरची काय माहिती मिळते त्यावर या लेखाच्या दुसऱ्या भागांत विवेचन करुं.

**प्र. सि. मराठे**
४०२ सनफ्लॉवर, ठक्कर पार्क,
वाकोला, सांताक्रूझ (पूर्व),
मुंबई - ४०००५५
दूरध्वनी - २६६७२२०५
भ्रमणध्वनी - ९६१९८९६४३५

●●●

(पृष्ठ क्र. २१ वरून..**कौटिल्यीय अर्थशास्त्र - 'राष्ट्र संकल्पना'** ...)

कुटुंबसंस्थेतून 'राष्ट्र' ही संकल्पना उत्क्रान्त होत गेली आहे असें अभ्यासकांचें म्हणणें आहे. ही उत्क्रांत होत असतांना काळानुरुप, आवश्यकतेनुसार त्यात घटकांची/अंगांची भर पडत गेली असावी. कौटिल्याच्या काळांत ही संकल्पना बहुतांशी पूर्णावस्थेला पोहोचली व राज्याची अंगे किंवा घटक किंवा प्रकृति यांची सात ही संख्या निश्चित झाली. ही 'सप्तांग संकल्पना' आजहि कालबाह्य झालेली नाही. केवळ नावें तेवढीं बदललेलीं आहेत. या घटकांचा सविस्तर विमर्श पुढील लेखांत घेऊं.

**डॉ. सौ. वैशाली जयंत दाबके**
३०२, मित्तल पार्क टॉवर २, रघुनाथ नगर,
तीन हात नाका,
ठाणे - ४०० ६०४

●●●

(मुख पृष्ठावरून) **संपादकीय**

शुक्रवार १८ मार्च २०१६ च्या "Times of India" मध्ये एक प्रदीर्घ मुलाखत देऊन श्री. श्रीरविशंकर यांनी आपली बाजू मांडली आहे. आपण यमुनेच्या पात्रातील पर्यावरणाची कुठलीही हानी केली नसून, राष्ट्रीय हरीत आयोगानेही आम्ही कुठल्याही कायद्याचा भंग केला नाही असे सांगितले आहे. हरीत आयोगाचा मुख्य आक्षेप हा आमच्या भव्य व्यासपीठाला होता. आम्ही कुठल्याही कायद्याचा भंग केला नसल्यामुळे आम्हांला कुठलाही दंड मान्य नाही आणि आम्ही तो भरणार नाही, या आपल्या भूमिकेचाही त्यांनी या मुलाखतीत पुनरोच्चार केला.

लोकशाहीत कुठल्याही गोष्टींच्या बाबतीत वाद निर्माण झाला की योग्य निर्णयाकरता सर्वांनाच न्यायालयांत जावे लागते. पर्यावरणाच्या संदर्भामध्ये अशा वादांमध्ये 'निर्णय' देण्याची पात्रता घटनेनीच स्थापन केलेल्या 'राष्ट्रीय हरीत लवादाकडे' (NGT, National Green Tribunal) सुपूर्त करण्यात आली आहे. म्हणूनच हरित लवादाचा निर्णय हा महत्वाचा आहे. अर्थातच या निर्णयालाही आव्हान उच्चतम न्यायालयात देता येते, पण तोपर्यंत तरी लवादाचा निर्णय हा अंतिम असतो. वकिली तर्क, आणि शाब्दिक श्लेष हे अशावेळी संपलेले असतात. राष्ट्रीय हरीत आयोगाचा निर्णय त्यांच्या संकेत स्थळावर तर उपलब्ध आहेच, पण The Indian Express या वृत्तपत्रानेही १० मार्च २०१६ ला तो प्रकाशित केला आहे. आपल्या निर्णयामध्ये लवादाने, घ्यायच्या परवानग्या, आणि यमुना नदीच्या पात्राच्या जैव वैविध्यतेबद्दल काय लिहीले आहे, हे मुळातूनच वाचणे आवश्यक आहे.

(7)It is the consistent view of the Experts and is sufficiently evident from the documents placed on record that the flood plains have been drastically tampered with while destroying the natural flow of the river, reeds, grasses, natural vegetation on the river bed. It has further disturbed the aquatic life of the river and destoryed water bodies and wet lands on the flood plains, which were in existence as noticed in our judgment in the case of Majoj Misra vs UNion of India and Ors., OA No.6 of 2012 decided on 13th January, 2015. Furthermore, they have constructed ramps, roads, compaction of earth, pontoon bridges and other semi-permanent or temporary structures etc. even without the permission of the concerned authorities including Ministry of Water Resources. The permission granted by Government of NCT of Delhi is of no consequence as it is not the competent authority for rights over the river and in any case, it was a permission for only flood situation as is evident from the bare reading of the permission. In fact, that is the stand of Government of NCT of Delhi itself before the Trubunal.

For the damage caused to the environment, ecology, biodiversity and aquatic life of the river, the Foundation should be held liable for its restoration in all respects. in that regard and in exercise of our powers under Sections 15 and 17 of the NGT Act, 2010 we impose an Environmental Compensation, initially of Rs. 5 crores.

एखाद्या पंथाच्या अनुयायांना 'गुरुवचन'

हे अंतिम असू शकते, पण लोकशाहीमध्ये घटनेनी निर्माण केलेल्या 'व्यवस्थे'चा आदर हा प्रत्येकालाच करायला लागतो. याचे प्रमुख कारण म्हणजे आपले निर्दोषत्व सिद्ध करण्याकरता तेथे तटस्थ व्यवस्था केलेली असते. लवादाचे निर्णय मान्य नसतील तर वरच्या व्यवस्थांकडे जाता येते, पण तोपर्यंत मात्र अशा निर्णयांचा आदर करायला लागतो. माध्यमांनी कदाचित 'दंड' हा शब्द वापरला असेल पण आयोगाने compensetion हा शब्द जर का वापरला होता, तर त्याचा आदर करणे हे बंधनकारक होते. युक्तिवाद, तर्कवादाचा आधार घेत 'पळवाटा' शोधणे हे नक्कीच स्वागतार्ह नाही, निदान अध्यात्म्यामध्ये तरी. राजकीय दडपण, भव्य दिव्यता, संख्याबळ, कदाचित व्यावहारिक सत्यामध्ये 'भ्रम' निर्माण करु शकेल, पण 'विश्वशांती' किंवा 'अध्यात्म' यामध्ये यामुळे काडीचाही फरक पडत नाही.

भारतानी सांख्य, योग, भक्ती, कर्म, राज, ज्ञान ई दर्शनांचा आधार घेत २०व्या शतकाच्या उत्तरार्धात जगाला अनेक 'गुरु' दिले. या सगळ्यांचा प्रभाव प्रामुख्याने 'सुबत्ता' आणि 'चंगळवादा'चा प्रभाव असलेल्या अमेरिका आणि पाश्चात्य देशांमध्येच अधिक दिसून आला. गेल्या ५० वर्षात जागतिक शांतता तर सोडाच, पण सामाजिक किंवा वैयक्तिक नीतिमध्ये सुद्धा प्रचंड ऱ्हास झाल्याचें दिसून येतें. 'जडवाद' किंवा 'चंगळवादाचा' लंबक केंद्रापासून जेंव्हा दूर जाऊ लागतो तेंव्हा व्यक्तिमधील अध्यात्माची 'भूक' वाढायला लागते असा निष्कर्ष या पार्श्वभूमीवर काढावा लागतो.

अध्यात्म 'बहिरंगा'चा फोलपणा दाखवून 'अंतरंगा'चा शोध घ्यायला शिकवतें. २१ व्या शतकातल्या गुरुंना आता अंतरंगाबरोबर बाह्यरंगाचाहि 'अर्थ' समजला आहे. सकाळी उठल्यावर तुम्ही कुठले 'दंतमंजन' वापरता किंवा कार्यालयात जाताना कुठला 'मुख आलेप' लावता यावर तुमच्या अध्यात्म्याची उंची आणि खोली मोजली जाण्याची वेळ आता दूर नाही. 'भव्य' आणि 'दिव्य' अध्यात्म्याबरोबरच आता, योगांतील 'अर्थ', ही नवीन व्यापारशाखा आता भारतानें जगाला दिलेली दिसते.

महाराष्ट्रामध्ये संत विचारांना एक अनन्यसाधारण महत्त्व आहे. त्यांच्या 'साधी राहणी आणि उच्च विचारसरणी'चा महाराष्ट्राच्या 'ऐहिक' आणि 'अध्यात्मिक' जीवनावर मोठा प्रभाव आहे. अत्यंत साध्या आणि व्यावाहारिक 'रूपकां'मधून समाजाचें प्रबोधन आणि जीवन जगण्याचा मोठा आशय ते आपल्याला देतात. म्हणूनच संत चोखामेळ्याचे खालील वचन त्याकाळा एवढेच, आजहि तेवढेंच लागू पडतें.

ऊस डोंगापरी। रस नोहे डोंगा।
काय भुललासी। वरलिया रंगा।
चोखा डोंगापरी। भाव नाही डोंगा।
काय भुललासी। वरलिया सोंगा।

अध्यात्माची जेव्हा संस्थाने होतात, तेंव्हा अध्यात्म मूळ दार्शनिक विचारापासून खूप दूर गेलेले असते. भव्य, दिव्य आणि प्रचंडतेच्या प्रदर्शनामुळे ही दरी भरुन तर येत नाहीच, पण ती आणखीन रुंदावते. यातल्या अनेक गुरुंची 'आर्थिक' साम्राज्ये, आणि भ्रष्टाचारापासून,

बलात्कारापर्यंतचे त्यांच्यावरील आरोप मति गुंग करतात.

आपले गणपति, दहीहंडी आणि नवरात्र हे सण राजकारण्यांनी पळवले आहेत. ढोल ताशे, ध्वनिप्रदूषण, वर्गणीच्या नावाखाली खंडणी वसुली आणि मिरवणूकितील हिडीस नाच आणि गाणी यांनी या सणांच्या मागचा मूळ सांस्कृतिक हेतू, आणि पावित्र्य केव्हांच नाहीसें करुन टाकलें आहें. हें सर्व जेव्हा आपत्री संस्कृति जपण्याकरतां चालू आहे असें सांगितले जातें, तेव्हां तर दांभिकतेनें परिसीमा गाठलेली असते.

वास्तविक 'श्रद्धा' किंवा 'भक्ती' माणसाला अधिक अंर्तमुख करते. यातूनच तो दुसऱ्याच्या स्वातंत्र्याचा आदर करायला शिकतो. यातला डोळसपणा जेव्हा हरवतो तेंव्हा या श्रद्धेचा व्यापार व्हायला लागतो. मनुष्य निःश्रद्ध असू शकत नाही, पण म्हणून श्रद्धांचा व्यापार होणेंहि योग्य नाही. गुन्हेगारीचा राजकारणांतील शिरकाव आणि प्रभाव जेवढा हानिकारक आहे, तेवढांच किंवा त्याहूनहि अधिक धोकादायक राजकारणावरील 'गुरू' प्रभाव ठरण्याची शक्यता आहे.

वंदनीय कोण हे आपल्या संतांनी स्पष्टपणे सांगून ठेवले आहे.

''बोले तैसा चाले, त्याची वंदावी पाऊले''

'योगगुरु' किंवा 'अध्यात्मिक' गुरुहि याला अपवाद नाहीत.

●●●

**वृत्तपत्र नोंदणी नियमाप्रमाणे (केंद्रीय) 'सद्धर्म' त्रैमासिकाच्या मालकीविषयी व इतर तपशिलासंबंधी माहितीचे निवेदन.**

**१. प्रकाशन स्थळ : लक्ष्मी केशव कार्यालय, प्रताप सिनेमासमोर, कोलबाड, ठाणे-४०० ६०१**

**२. प्रसिद्धीचा नियत काल : दर चौथ्या महिन्याच्या पहिल्या तारखेस.**

**३. मुद्रकाचे नाव, राष्ट्रीयत्व व पत्ता : अनंत विनायक धोरे, भारतीय, पत्ता वरीलप्रमाणे.**

**४. प्रकाशकाचे नाव, राष्ट्रीयत्व व पत्ता : वरीलप्रमाणे.**

**५. संपादकाचे नाव, राष्ट्रीयत्व व पत्ता : डॉ. विजय वासुदेव बेडेकर, भारतीय पत्ता वरील प्रमाणे.**

**६. एकूण भांडवलाच्या १ टक्क्याहून अधिक भांडवल घातलेल्या भागीदार व्यक्तीसह वृत्तपत्राच्या मालकांची नांवे : सौ. मालतीबाई नवाथे ट्रस्ट. पत्ता वरीलप्रमाणे.**

**मी अनंत विनायक धोरे, जाहीर करतो की, वर दिलेला तपशील माझ्या माहितीप्रमाणे व समजुतीप्रमाणे बरोबर आहे.**

**सही - अनंत विनायक धोरे**

**संपादक** : डॉ. विजय वासुदेव बेडेकर
**प्रकाशक व मुद्रक** : अनंत विनायक धोरे, लक्ष्मी केशव कार्यालय, प्रताप सिनेमासमोर, कोलबाड, ठाणे - ४०० ६०१
**मुद्रणस्थळ** : परफेक्ट प्रिन्टस्, नूरीबाबा दर्गा रोड, ठाणे - ४०० ६०१